७० वर्ष

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. २३ मार्च २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०८७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## अशोक खरातचा गरोदर महिलेवरही अत्याचार

नाशिक (दै. संध्या) : नाशिकमधील स्वयंघोषित अंकशास्त्रज्ञ अशोक खरात याच्या काळ्या कारनाम्यांची यादी अधिकच भयावह होत चालली आहे. आधीच अनेक महिलांच्या शोषणाप्रकरणी कोठडीत असलेल्या खरातविरुद्ध आता नाशिकच्या सरकारवाडा पोलिस ठाण्यात आणखी एक अत्यंत गंभीर गुन्हा दाखल झाला आहे. पीडित महिला गरोदर असताना तिच्यावर 'पूजा विधी'च्या नावाखाली अत्याचार केल्याचा धक्कादायक आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे. नव्याने समोर आलेल्या तक्रारीनुसार, पीडित महिला गर्भवती असताना अशोक खरातने तिला विधी करण्याच्या बहाण्याने बोलावले होते. यावेळी महिलेसोबत आलेल्या तिच्या पतीला कार्यालयाबाहेर बसवून त्याने आतमध्ये 'उपचार' आणि 'धार्मिक विधी'चे नाटक करत तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. या कृत्याबद्दल कोणालाही सांगितल्यास जीवे मारण्याची धमकीही त्याने पीडितेला दिली होती. या नवीन तक्रारीमुळे अशोक खरातचा पाय आता आणखी खोलात गेला आहे.

### ढिंग-टांग




# भोंदू अशोक खरातचे सर्वाधिक पुरावे माझ्याकडेच

## केवळ फोटोवरून राजकारण नको, इंटेलिजन्सच्या आधारे आम्हीच भांडाफोड केली : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई (दै. संध्या)

भोंदू बाबा अशोक खरात यांच्याकडे विरोधी पक्षातील कोणकोणते नेते जात होते याचे मी पुरावे देऊ शकतो. माझ्याकडे सर्वांत जास्त पुरावे आहेत, पण ते पोलिसांकडे आहेत, ते पोलिसांचे काम आहे, खरातांना भेटणाऱ्यांपैकी कुणाचे यात सहभाग असेल तर कारवाई होईल, पण केवळ भेटलंय म्हणून कारवाई करायला लागलो तर कोणी त्यांना 40 किमी पाण्याची लाईन दिली हे सर्वांना समजले आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भोंदू बाबा प्रकरणी हवेत बोलण्याला काही अर्थ नाही. खरात प्रकरण अत्यंत गंभीर आहे, त्या प्रकरणाचा भांडाफोडा आम्हीच केला आहे. या प्रकरणात महिला लाजेखातर पुढे येत नाही, पण पिडीत महिलांना त्यांच्या कुटुंबियांना धीर देत पुढे



आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. यात काही महिला प्रतिसाद देत आहेत. प्रकरणाकडे लक्ष घालण्याच्या सूचना मी डीजींना दिल्या आहे ते या सर्व प्रकरणावर लक्ष ठेवून आहेत. एसआयटी आणि नाशिक सीपी मिळून हे काम पूर्ण करत आहेत. या प्रकरणी कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, खरात प्रकरणाला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न सुरू आहे. कुणाजवळ काही पुरावा असेल तर त्यांनी तो नक्की आणून द्यावा त्यावरही कारवाई होईल. पण विनाकारण प्रत्येक गोष्टीला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न करू नये. सरकार आणि पोलिस जे करायचे ते करत कठोर कारवाई करतील. फोटो कुणाचेही असू शकतो, पण ज्यांनी मंत्रिमंडळाची बैठक बोलावून 40 किलोमीटरची पाइपलाइन वळवून अशोक खरातच्या संस्थेला पाणी दिले, त्या मंत्र्यांबाबत विरोधक गप्प का आहेत? केवळ फोटोवरून राजकारण करणाऱ्यांनी या धोरणात्मक निर्णयावर का मौन पाळले आहे? देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आम्हाला राजकारणात नाही तर महिलांच्या प्रतिष्ठेत इंटरेस्ट आहे. महिलांवर जे अन्याय झालेत त्यासंदर्भात आधी चौकशी होईल, प्रत्येक महिलेला न्याय देण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत, महिलांना न्याय देण्यासाठी चौकशी करणार.

## IG दत्तात्रय कराळेंनी अशोक खरातला पाठिशी घातले

सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी नाशिकचे तत्कालीन आयजी दत्तात्रय कराळे यांच्यावर अशोक खरातला पाठिशी घालण्याचा आरोप केला आहे. अशोक खरात हा दत्तात्रय कराळे यांचा गुरू होता. त्यामुळे ते आपल्या गुरूवर कशी कारवाई करतील? त्यांनीच त्याला पाठिशी घातले, असे त्या म्हणाल्यात. यावेळी त्यांनी भोंदू अशोक खरातचे एन्काउंटर होण्याची भीतीही व्यक्त केली. तृप्ती देसाई बोलताना म्हणाल्या की, अनेक बडे नेते अशोक खरातच्या संपर्कात होते. त्यांच्यात आर्थिक संबंधही होते. आमदार, खासदार, आयएएस अधिकारी आदी सर्वांचेही खरातशी संबंध होते. या सर्वांची नावे पुढे येऊ नयेत म्हणून एकच मार्ग उरतो. तो म्हणजे खरातला संपवण्याचा. त्यामुळे अशोक खरातचे एन्काउंटर होऊ शकते. त्यामुळेच मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हा डाव उधळवून लावण्याचे आवाहन केले आहे. हे रॅकेट पूर्णतः उद्धवस्त करण्याची गरज आहे. या प्रकरणात जे कुणी अधिकारी, नेते आहेत, त्यांच्यावर मकोका अंतर्गत झाली पाहिजे. अशोक खरातला शिक्षा झाली पाहिजे. तसेच त्याच्याशी संबंध असलेल्यांवरही कारवाई झाली पाहिजे. तृप्ती देसाई पुढे म्हणाल्या, गतवर्षी मार्च महिन्यात श्रीरामपूरच्या एका दैनिकात अशोक खरातशी संबंधित एक बातमी आली होती. तेव्हा मला फोन आला होता. कॅप्टन म्हणून ओळखला जाणाऱ्या अशोक खरातचे काही व्हिडिओ आमच्याकडे येणार असल्याचे मला सांगण्यात आले होते. त्यानंतर महिला आयोगाच्या तत्कालीन अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी दबाव आणला. जे लोक पेनड्राईव्ह देणार होते, त्यांच्यावर दबाव टाकण्यात आला. त्यामुळेच त्या लोकांनी ते व्हिडिओ देण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर गत 5 मार्च रोजी काही लोक तो पेनड्राईव्ह घेऊन आले. त्यानंतर अशोक खरात परदेशात पळून जाणार होता.

### ब्रेकिंग न्यूज

## ज्याला मूल-बाळ नाही त्यांनाही व्हायचे

मिरगाव (दै. संध्या) : महाराष्ट्रात सध्या भोंदूबाबा अशोक खरातचे प्रकरण चांगलेच गाजत आहे. अनेक महिलांवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या या खरातच्या नादी लागल्याने राज्याच्या महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना देखील त्यांच्या अध्यक्ष पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. आता अशोक खरातबद्दल स्थानिक लोकांकडून काही माहिती समोर यायला लागली आहे. बाबाकडे गेल्यानंतर तो परफेक्ट सांगतो. तो सांगतो ते होतेच, असे आमच्याकडे दोन-तीन किस्से घडले असल्याचे स्थानिकाने सांगितले आहे. मिरगावमध्ये अशोक खरातचे मोठे घर आहे. याच गावातील काही लोकांशी संवाद साधण्यात आला. यावेळी एका इसमाने सांगितले की, "बाबाकडे (अशोक खरात) गेल्यानंतर तो परफेक्ट सांगतो. तो सांगतो ते होतच, असे आमच्याकडे दोन-तीन किस्से घडले होते. ज्याला मूल-बाळ होत नाही, त्याला सांगितल्यानंतर मूल-बाळ झाल. असे किस्से परिसरात ऐकले आहेत. त्या माणसाबद्दल लोकांमध्ये विश्वास निर्माण झाला होता. बाहेरचे अनेक लोक त्यांच्याकडे येत होते. बाबांनी असे करायला नको होते. परिसरात त्यांचे खूप मोठे नाव होते. आता गावाचे नाव बदनाम झाले असल्याचे येथील ग्रामस्थाने बोलताना सांगितले आहे.

## अनेक पदार्थ बंद; मेनू निम्म्यावर

इगतपुरी (दै. संध्या) : आखाती देशांतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या पुरवठा अडचणींचा फटका इगतपुरीतील हॉटेल व्यवसायाला बसला आहे. गॅसअभावी अनेक हॉटेलांनी मेनू कमी केला असून काही पदार्थ पूर्णपणे बंद करण्यात आले आहेत. मुंबई–आग्रा महामार्गावरील थ्री स्टार मानस लाइफस्टाइल रिसॉर्टमध्येही परिस्थिती गंभीर बनली आहे. रिसॉर्टमध्ये पूर्वी सुमारे दीडशे ते दोनशे पदार्थांचा विस्तृत मेनू उपलब्ध होता. मात्र सध्या तो केवळ ५० ते ६० पदार्थांवर आला आहे. साउथ इंडियन व चायनीज पदार्थ पूर्णपणे बंद करण्यात आले असून नाश्त्यातील अनेक आयटम कमी करण्यात आले आहेत. नॉन-व्हेज विभागात मटनही मेनूतून वगळण्यात आले आहे.

## एआयमुळे शिक्षण क्षेत्रात मोठे बदल

चांदवड (दै. संध्या) : कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग या तंत्रज्ञानामुळे औषधनिर्मिती, आरोग्यसेवा आणि शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडू शकतात, असा निष्कर्ष येथे आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादात मांडण्यात आला. संशोधनाची गती वाढविण्यासाठी एआयचा प्रभावी वापर आवश्यक असल्यावर तज्ज्ञांनी भर दिला. एसएनजेबी संचलित श्रीमान सुरेशदादा जैन फार्मसी महाविद्यालयात आयोजित या परिसंवादात विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. पहिल्या दिवशी डॉ. सतीश पोलशेट्टीवार यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगच्या संशोधनातील उपयोगांविषयी मार्गदर्शन करत औषधनिर्मिती, आरोग्यसेवा आणि शिक्षण क्षेत्रातील बदल स्पष्ट केले.

## मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात विरोधी पक्षांचे ७ आरोप

मुंबई (दै. संध्या)

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्यासाठी संसदेत विरोधी खासदारांनी नोटीस दिली आहे. लोकसभा-राज्यसभेत आणलेल्या नोटीसमध्ये मुख्य निवडणूक आयुक्तांवर 7 आरोप लावण्यात आले आहेत. ते सरकारच्या इशाऱ्यावर काम करतात, असे म्हटले आहे. ज्ञानेश कुमार यांनी SIR द्वारे लोकांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला, असा विरोधकांचा आरोप आहे. नोटीसमध्ये त्यांच्या नियुक्तीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. 12 मार्च रोजी संसदेच्या दोन्ही सभागृहात सादर केलेल्या नोटीसमध्ये मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध सिद्ध



झालेल्या गैरवर्तनाच्या आधारावर त्यांना पदावरून हटवण्याची मागणी करण्यात आली आहे. लोकसभेत 130 आणि राज्यसभेत 63 विरोधी खासदारांनी मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्यासाठी प्रस्ताव आणण्याची मागणी केली आहे.

# शिवसेना ठाकरे गटात अंतर्गत धुसफूस?

*उद्धव ठाकरेंसह खासदारांची बैठक पार; 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चेनंतर मातोश्रीवर खलबतं*

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्रात सध्या ऑपरेशन टायगरची चर्चा सुरू असतानाच शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दुपारी पक्षाच्या सर्व खासदारांची तातडीने बैठक बोलावली होती. या बैठकीमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. तसेच पक्षांतर्गत नाराजी असल्याचे देखील बोलले जात आहे. काही दिवसांपूर्वीच उपमुख्यमंत्री व शिंदे गटाचे प्रमुख एकनाथ शिंदे हे दिल्लीच्या दौऱ्यावर गेले होते, तेव्हापासून ऑपरेशन टायगरची चर्चा सुरू झाली होती. याच पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी बैठक बोलावली असल्याचे समजते.



दिल्लीत खासदार संजय राऊत यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या ठाकरे गटाच्या खासदारांच्या महत्त्वपूर्ण बैठकीत अंतर्गत नाराजी उफाळून आल्याची माहिती मिळत असून, यावेळी खासदारांनी थेट वरिष्ठ नेत्यांसमोर आपल्या तक्रारींचा पाढा वाचला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे खासदारांना पुरेसा वेळ देत नाहीत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षाकडून अपेक्षित असलेले पाठबळ किंवा मदत मिळाली नाही, अशा शब्दांत खासदारांनी आपली उघड नाराजी व्यक्त केल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. संजय राऊत यांच्या बैठकीत खासदारांनी नेतृत्वावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याचे समजते. जर उद्धव ठाकरेंना प्रकृती किंवा इतर कारणांमुळे काही मर्यादा असतील, तर आदित्य ठाकरे संपूर्ण महाराष्ट्र का फिरत नाहीत? असा सवालही खासदारांनी विचारला होता. खासदारांच्या या आक्रमक भूमिकेनंतर आज उद्धव ठाकरे यांनी बैठक बोलावली आहे. आता या बैठकीतून सध्यातरी सर्व काही आलबेल असल्याचे सांगण्यात येत आहे.

# भोंदू बाबांच्या दरबारात जाणाऱ्या मंत्र्यांना 'सहआरोपी' करा

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राची भूमिका ही कायम पुरोगामी राहिलेली आहे. राज्यात जर अशी भोंदूगिरी फोफावत असेल आणि त्यात आमचे सत्ताधारी सहभागी होत असेल तर त्या भोंदू बाबांच्या दरबारात जाणाऱ्या मंत्र्यांना सहआरोपी केली पाहिजे, त्याशिवाय ही भोंदूगिरी थांबणार नाही, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत म्हणाले की, अशोक खरातांचे काय प्रकरण होते हे आम्हाला माहिती नाही हे सांगणे म्हणजे त्या प्रकरणातून पळवाट काढणे आहे. या प्रकारचा पहिला गुन्हा त्यांच्यावर 2003 मध्ये दाखल झाला आहे. एका वृत्तपत्राने यात बातम्या केल्या तर त्या पत्रकारांना धमक्या देण्यात आल्या. 2003 मध्ये गुन्हा दाखल झाला 2005 मध्ये माहिती समोर आली तरीही मंत्री मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री,



**महाराष्ट्राची पुरोगामी प्रतिमा मलिन करू नका- संजय राऊत**

त्यांच्याकडे जात असतील, पायावर डोके ठेवत पुजा करत असतील तर त्यांनाही सहआरोपी केले पाहिजे.

संजय राऊत म्हणाले की, खरात प्रकरणी पोलिस तपास सुरू आहे, नाशिकचे पोलिस आयुक्त संदीप कर्णे हे सक्षम अधिकारी आहेत. या प्रकरणात कुणाचेही नाव आले तर त्यांना सोडण्यात येणार नाही, मला नाशिक पोलिस आयुक्तांवर खात्री आहे.

संजय राऊत म्हणाले की, दीपक केसरकर यांच्यावर विश्वास ठेवू नका. ते आमच्या सरकारमध्ये होते ते नंतर दुसऱ्या सरकारमध्ये पळून गेले हे जरी खरे असले तरी या गोष्टीचा छंद असणाऱ्या लोकांचा एक गट तयार झाला आणि ते आमच्या पक्षातून बाहेर पडले. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांचा पराभव करता यावा म्हणून राष्ट्रपती शासन लावण्याचे प्रयत्न करत आहेत. संजय राऊत म्हणाले की, इराण-इस्रायल, अमेरिका युद्धात आतापर्यंत हजारो बॉम्ब पडले आहेत. त्यातून धुराचे, आगीचे लोळ निघाले. तेल विहिरी जाळण्यात आल्या. त्यातून तेहरानचे आकाश काळेकुट्ट झाले व ॲसिडचा पाऊस पडू लागला. हे विषारी काळे ढग भारताच्या आकाशात पोहोचतील अशी भीती आहे. बॉम्ब न पडताही आपले प्रचंड नुकसान त्यात होईल!

# पकडला गेला तरच 'भोंदू' का?

## भक्तांच्या आंधळेपणाचे काय?

मुंबई (दै. संध्या)

स्वत:ला देवाचा अवतार सांगून महिलांचे शोषण करणारा भोंदूबाबा 'कॅप्टन' अशोक खरात सध्या गजाआड आहे. पोलिसांनी त्याच्याकडून 58 व्हिडिओ जप्त केले असून, यात अनेक बडे नेते आणि हस्तींचे चेहरे उघडे पडण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर प्रसिद्ध अभिनेते अतुल कुलकर्णी यांनी सोशल मीडियावर प्रश्नांची सरबत्ती करत समाजाला आरसा दाखवला आहे. अतुल कुलकर्णी यांनी उपस्थित केलेला पहिलाच प्रश्न काळजाला भिडणारा आहे. ते विचारतात, एखादा बाबा पकडला गेला कीच त्याला 'भोंदू' का म्हणायचे? त्याआधी तो काय असतो? आणि जे कधीच पकडले जात नाहीत, त्यांचे काय? हा प्रश्न केवळ खरातपुरता मर्यादित नसून, गल्लीबोळात उभे राहिलेल्या स्वयंघोषित महाराजांच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा आहे. अतुल कुलकर्णी म्हणाले की, जेव्हा एखाद्या महाराजाचे काळे कारनामे चव्हाट्यावर येतात, तेव्हा त्याचे अनुयायी स्वतःला 'पीडित' मानतात. पण , हे भक्त नेमके कोण असतात? भागीदार, पीडित, आंधळे, अंधश्रद्धाळू की मूर्ख?अंध होण्याला कारणीभूत कोण? फसवणारा की स्वतःहून फसणारा? असा सवाल कुलकर्णी यांनी केला आहे. हे सगळं जितकं धर्मकारणाला लागू होतं, तितकंच ते राजकारणालाही लागू होतं का?" ज्याप्रमाणे आपण डोळे मिटून एखाद्या बाबावर विश्वास ठेवतो, तसाच विश्वास आपण राजकीय नेत्यांवरही ठेवतो का? असा बोचरा सवाल त्यांनी केला आहे.

# राज्यातील हॉटेल, उपहारगृह चालकांना दिलासा:व्यावसायिक गॅस पुरवठ्यात २०% वाढ

## नागरी व पुरवठा मंत्री छगन भुजबळांची माहिती

मुंबई (दै. संध्या)

इराण विरुद्ध अमेरिका - इस्त्रायल युद्धामुळे अडचणीत सापडलेल्या राज्यातील हॉटेल, ढाबे व उपहारगृह चालकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. केंद्र सरकारच्या निर्देशांनुसार व्यावसायिक गॅसचा पुरवठ्यात 20 टक्क्यांची वाढ करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी रविवारी दिली. यामुळे छोट्या व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. आखाती देशांत सुरू असलेल्या युद्धामुळे सरकारने व्यावसायिक गॅसच्या पुरवठ्यावर निर्बंध घातले होते. केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने 21 मार्च रोजी जारी केलेल्या सूचनेनुसार यापूर्वी राज्याला केवळ 30 टक्के एलपीजी वाटप मंजूर होते. आता 23 मार्चपासून पुढील आदेश येईपर्यंत अतिरिक्त 20 टक्के वाटप वाढवण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील एकूण गॅस पुरवठा हा संकटपूर्व पातळीच्या 50 टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. या वाढीव 20 टक्के गॅस पुरवठ्यात



हॉटेल्स, ढाबे, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टिन, अन्न प्रक्रिया उद्योग व दुग्ध व्यवसायाला प्राधान्य देण्यात येणार आहे.

याशिवाय राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून चालवण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टिन, कम्युनिटी किचन्स तसेच स्थलांतरित मजुरांसाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांनाही या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. 'प्रस्तुत निर्णयामुळे व्यावसायिक एलपीजीच्या तुटवड्यामुळे अडचणीत आलेल्या हॉटेल व अन्नपदार्थ व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळेल. पण गॅस मिळवण्यासाठी त्यांना तेल विपणन कंपन्यांकडे नोंदणी करणे व पीएनजी जोडणीसाठी अर्ज करणे आवश्यक असणार आहे', असे छगन भुजबळ यांनी सांगितले आहे.

दुसरीकडे, सरकारने राज्यातील केरोसिन वितरणासंबंधीही काही महत्त्वाचे निर्णय घेतलेत. त्यानुसार, प्रलंबित परवाने आपोआप नुतनीकरण झाल्याचे मानण्यात येणार आहे. त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. याशिवाय परवाने वारसांच्या नावाने तत्काळ वर्ग करण्याचे निर्देशही देण्यात आलेत. ज्या गावांमध्ये किरकोळ केरोसिन परवानाधारक उपलब्ध नाहीत, त्या ठिकाणी रास्तभाव दुकान चालवणाऱ्या दुकानदारांना किरकोळ केरोसिन परवानाधारक म्हणून मान्यता देऊन परवाना देण्याचे निर्देश देण्यात आलेत.

सरकारने 20 मार्च रोजी जारी करण्यात आलेल्या शासनपत्रातही या संदर्भातील कार्यवाही करण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. या सर्व निर्णयामुळे राज्यातील इंधन पुरवठ्याला अधिक गती मिळण्याची शक्यता आहे.

## संपादकीय

# जरा याद करो कुर्बानी

दीडशे ते दोनशे वर्ष इंग्रजांच्या पारतंत्र्यात असणाऱ्या भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले. अनेक जण फासावर चढले तर कित्येकांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या. या वीर स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत माता इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त झाली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी छातीवर गोळ्या झेलल्या तर अनेक स्वातंत्र्य सैनिक हसत हसत फासावर चढले. भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव हे स्वातंत्र्य सैनिक देखील भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हसत हसत फासावर चढले आणि शहीद झाले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे स्वातंत्र्य सैनिक शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी इंग्रजांनी फाशी दिली होती. आज २३ मार्च हा दिवस शहीदांच्या नावे कोरला गेला गेला आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणाचे बलिदान दिले. ९५ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी दिली होती. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी आजचा दिवस संपूर्ण देशात शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो. १९२८ मध्ये सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले होते. या कमिशनला विरोध म्हणून लाला लजपतराय यांनी मोठा मोर्चा काढला होता. सायमन कमिशनला विरोध करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर इंग्रजांनी लाठीहल्ला केला. या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्यातच त्यांचा मृत्यू झाला. लाला लजपतराय यांच्या



मृत्यूनंतर संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट उसळली. लाला लजपतराय यांच्या मृत्युनंतर देशातील जहाल गटाचे स्वातंत्र्य सैनिक कमालीचे चिडले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आणि अन्य जहाल क्रांतिकारकांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्याची शपथ घेतली. लाला लजपतराय यांच्या मृत्यूच्या एक महिन्याच्या आतच या क्रांतिकारकांनी आपली शपथ पूर्ण केली आणि १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटिश अधिकारी सँडर्सला गोळ्या घालून ठार केले. काही काळ ते भूमिगत राहिले मात्र फितुरीमुळे ते पोलिसांच्या हाती लागले. ७ ऑक्टोबर १९३० रोजी इंग्लिश कोर्टाने भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली. यानंतर भगतसिंग यांची शिक्षा कमी व्हावी यासाठी फेर याचिका दाखल करण्यात आली मात्र १० मार्च १९३१ रोजी ती याचिका कोर्टाने फेटाळली. २३ मार्च हा दिवस भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या फाशीसाठी निश्चित करण्यात आला. २३ मार्च १९३१ रोजी सकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी या तिघांनी मेरा रंग दे बसंती चोला ...... हे गाणे गायले. फासावर लटकतानाही भारत मातेच्या या सुपुत्रांच्या चेहऱ्यावर कसल्याही प्रकारचे दुःख किंवा पश्चाताप नव्हता उलट भारत मातेसाठी फासावर जात असल्याचा अभिमान होता. आजच्या दिवशी भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात अज्ञात शहिदांना शहिद दिनी विनम्र अभिवादन!

## आगामी साप्ताहिकी

२३ मार्च २०२६ सोमवार
श्री पंचमी
श्री लक्ष्मी पंचमी
जागतिक हवामान दिन
शहीद निद
सटर फटर महाराज पुण्यतिथी – धालेवाडी, पुरंदर (पुणे)
जगदंबा यात्रा – गोडेगांव (श्रीरामपूर)
२४ मार्च २०२६ मंगळवार
नाईकबा पालखी सोहळा – बनपुरी कराड
महाकाली यात्रा – चंद्रपूर प्रारंभ
२५ मार्च २०२६ बुधवार
आयंबील ओळी प्रारंभ (जैन)
एकवीरादेवी पालखी सोहळा – कार्ला
२६ मार्च २०२६ गुरुवार
दुर्गाष्टमी
श्री रामदासस्वामी जयंती
श्रीराम नवी
भवानदेवी उत्पत्ती
साईबाबा उत्सव प्रारंभ – शिर्डी
गजानन महाराज उत्सव शेगांव
२७ ऑगस्ट २०२० शुक्रवार
चैत्री नवरात्र समाप्ती
श्री स्वामिनारायण जयंती
२८ मार्च २०२६ शनिवार
साईबाबा उत्सव समाप्ती – शिर्डी
२९ मार्च २०२६ रविवार
कामदा एकादशई
चैत्री यात्रा – पंढरपूर
भाऊ महाराज साल्पेकर पुण्यतिथी – नागपूर
साधू महाराज पुण्यतिथी – उमरखेड (पुसद)
शंभूमहादेव यात्रा – शिखर शिगणापूर

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८९५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 8 | | 4 | | | 3 |
| 4 | | 6 | | 3 | | | 9 | 5 |
| | | 3 | 1 | 5 | | 6 | | 2 |
| 1 | | | 6 | | | | | 7 |
| 5 | | | | 8 | | | | 6 |
| 6 | | | | | 5 | | | 4 |
| 2 | | 7 | | 1 | 8 | 3 | | |
| 3 | 5 | | | 4 | | 2 | | 8 |
| 8 | | | 7 | | 3 | | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८९४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 6 | 9 | 2 | 1 | 8 | 3 | 7 | 4 |
| 4 | 8 | 3 | 7 | 5 | 6 | 9 | 2 | 1 |
| 2 | 1 | 7 | 3 | 9 | 4 | 5 | 8 | 6 |
| 3 | 9 | 6 | 8 | 2 | 1 | 7 | 4 | 5 |
| 1 | 2 | 4 | 5 | 7 | 3 | 6 | 9 | 8 |
| 7 | 5 | 8 | 4 | 6 | 9 | 2 | 1 | 3 |
| 6 | 3 | 1 | 9 | 4 | 7 | 8 | 5 | 2 |
| 8 | 7 | 5 | 1 | 3 | 2 | 4 | 6 | 9 |
| 9 | 4 | 2 | 6 | 8 | 5 | 1 | 3 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९५२ – कॅनाडातले पहिले वृत्तपत्र ' द हॅलिफॅक्स गॅझेट' प्रसिद्ध होऊ लागले.
- २००७ – थायलंडमध्ये युद्धाचा सराव करुन परतणाऱ्या नौसेनेचे एक हेलिकॉप्टर सुरीन प्रांतात दुर्घटनाग्रस्त झाल्याने त्यातील सर्व नऊ व्यक्ती ठार झाले.

### राष्ट्रीय

- १९३१ – भारतीय क्रांतिकारी भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांना फाशी.
- १९४२ – जपानी सैन्याने अंदमान द्वीपे काबीज केली.
- १९१८ – सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत अस्पृश्यता निवारणाच्या ठरावावर सह्या केल्या.
- २००२ – भारतीय महिला क्रिकेट संघाने पार्ल येथील कसोटीत दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघाचा पराभव करून परक्या भूमीवरचा पहिला विजय नोंदविला.

### जन्म

- १७६९ – भूशास्त्राचे उद्गाते, भूरूपकी आणि खनिजशास्त्रीय नकाशांचे जनक विल्यम स्मिथ यांचा जन्म.
- १८६७ – इंग्रज खगोल वैज्ञानिक रिचर्ड अँथनी प्रॉक्टर यांचा जन्म.
- १९१० – काँग्रेसमधील समाजवादी गटाचे नेते, समाजवादी पक्षाचे संस्थापक राम मनोहर लोहिया यांचा जन्म.

### निधन

- १७७८ – जेम्स चूर्ण या हिवतापावरील औषधाचे स्वामित्व हक्क मिळविणाऱ्या रॉबर्ट जेम्सचे निधन. हे औषधासंबंधीचे पहिले पेटंट असावे असे मानले जाते.
- १९३१ – भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू या तीन क्रांतीकारांना लाहोर तुरुंगात फासावर चढविण्यात आले.

## उपदेशकथा

### शहरी आणि खेडवळ

एका शेतातल्या उंदराने शहरवासी मित्राला आपल्या घरी जेवायला बोलविले. शहरी मित्राने कुतूहलाने ते आमंत्रण स्वीकारले पण जेवणाचे पदार्थ म्हणजे नुसती धान्येच होती. ते पाहून शहरी उंदीर म्हणाला, 'मित्रा, तू अगदी साध्या किड्यामुंगीसारखा जगतोस असं दिसतं. तू आता माझ्याबरोबर शहराकडे चल. तिथं सगळे चांगले पदार्थ आहेत. आपण दोघं मिळून ते खात जाऊ.'

त्याप्रमाणे ताबडतोब ते दोघे शहरात गेले. शहरी उंदराने त्या खेडवळ उंदराला पाव, खवा, सुकामेवा, शेंगा, साखर आणि फळफळावळ दाखविली. ते पाहून खेडवळ उंदीर अगदी दीपून गेला. त्याने आपल्या मित्राच्या भाग्याची स्तुती केली आणि स्वत:च्या कमनशिबाबद्दल त्याला वाईट वाटले. ते जेवायला सुरुवात करणार इतक्यात दार वाजले. त्याबरोबर ते दोन छोटे जीव इतके घाबरले की ते एका फटीत लपले. जरा वेळाने ते परत सुक्या मेव्याला तोंड लावणार तोच पुन्हा दुसरे कोणीतरी त्या खोलीत आले आणि पुन्हा ते दोघेजण जीव घेऊन आपल्या बिळात शिरले. मग मात्र उपाशी राहावे लागले तरी चालेल पण आपलंच घर बरं असा त्या खेडवळ उंदराने निश्चय केला. 'राम राम मित्रा!' तो उसासा टाकून म्हणाला, 'मला आपलं माझं ते कच्चं धान्यच बरं वाटतं.

कथा उपदेश : भीतीयुक्त श्रीमंती जीवनापेक्षा शांततामय आणि साधे गरिबी जीवन चांगले.

## पंचांग

| पंचांग | करण:कौलव |
|---|---|
| २३ मार्च २०२६ | २९:२२:०३+ |
| सोमवार | सूर्य:मीन |
| विक्रम संवत्– २०८२ | चन्द्र:वृषभ०४:१३:४१ |
| चैत्रशीर्ष शके | हिजरी सन् – १४४६ |
| संवत्– १९४८ | मुस्लिम मास – शव्वाल |
| संवत्सर – पराभवनाम | तारीख – ३ |
| अयन– उत्तरायणारंभ | विशेष |
| मास– फाल्गुन | श्री पंचमी |
| ऋतु– सौर वसंत | श्री लक्ष्मी पंचमी |
| शुक्ल पक्ष | जागतिक हवामान दिन |
| तिथि:पंचमी १८:३८:३७ | शहीद निद |
| नक्षत्र:कृत्तिका २०:४९:२१ | सटर फटर महाराज |
| योग:विष्कुम्भ १२:२१:३२ | पुण्यतिथी – धालेवाडी, |
| करण:बव ०७:५७:०७ | पुरंदर (पुणे) |
| करण:बालव १८:३८:३७ | जगदंबा यात्रा – गोडेगांव |

## : SMS :

Sardar got promotion in office as manager. To give surprise to his wife, he telephoned her & said "Tonight u r going to sleep with the manager"

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३० | २१.९ |
| अहमदनगर | ३०.४ | १९.५ |
| अकोला | ३१.७ | २३.९ |
| अमरावती | ३१ | २२.८ |
| बीड | ३२ | २३.३ |
| भंडारा | ३०.८ | २१.७ |
| बुलढाणा | १८.६ | १४.४ |
| चंद्रपूर | ३२ | २२.८ |
| चेन्नई | ३७.२ | २३.९ |
| नवी दिल्ली | २०.८ | १६.२ |
| धुळे | ३०.६ | २२.५ |
| गोंदिया | ३०.१ | २०.८ |
| जळगाव | ३१.२ | २२.८ |
| कोल्हापूर | ३१.७ | १७.८ |
| लातूर | ३०.६ | २१.२ |
| मुंबई | ३१.५ | २५.९ |
| नागपूर | | |
| नांदेड | ३२.६ | २३.३ |
| नंदूरबार | २८.७ | २२.३ |
| नाशिक | २९.६ | १८.८ |
| पुणे | २९.३ | १८.६ |
| पंढरपूर | ३२.८ | २१.२ |
| सातारा | ३१.५ | १६.४ |
| सांगली | ३२.२ | १९.१ |
| सोलापूर | ३२.८ | २३.४ |
| वर्धा | ३२ | २४ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** न्याय प्रविष्ठ प्रकरणातून लाभ होतील. थोरा–मोठयांच्या सहकार्याने आपली रेंगाळलेली कामे मार्गी लागतील.

**वृषभ :** कर्जप्रकरणे मंजूर होतील. जोडधंद्यातून चांगली आर्थिक प्राप्ती होईल. कौटुंबिक शुभ–समारंभाचे आयोजन केले जाईल.

**मिथुन :** शेजाऱ्यांचे सहकार्य लाभेल. सांस्कृतिक कार्यक्रमात सक्रीय सहभाग घ्याल. जाणीवपूर्वक आपल्या विचारात बदल करण्याचा प्रयत्न करावा.

**कर्क :** जगाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलावा. सामाजिक क्षेत्रातील आपल्या आघाडीच्या नेतृत्वामुळे समाजात प्रतिष्ठा उंचावेल.

**सिंह :** आत्मविश्वास व मनोबल उत्तम राहील. मिळालेल्या संधींचा लाभ आपले भविष्य उज्वल करणारा राहील. आर्थिक आवक वाढेल.

**कन्या :** साचेबद्ध जीवनातून विरंगुळा मिळावा म्हणून सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घ्याल. अचानक सहलीचे आयोजन केले जाईल.

**तुळ :** प्रगतीपथावर मार्गक्रमण करण्यासाठी सतत नवीन योजनांची आखणी कराल. समाजात आपल्या मतांचा आदर होईल.

**वृश्चिक:** मित्रपरिवाराचे सहकार्य लाभेल. आकर्षक भेटवस्तू मिळतील. सुग्रास भोजनाचे बेत आखले जातील. नवीन परिचय होतील.


**धनु :** व्यवसाय उद्योगात मोठया प्रमाणात गुंतवणूक केली जाईल. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन आपल्या व्यावसायिक उत्पन्नाचा दर्जा सुधारला जाईल.

**मकर :** कामाच्या विस्ताराचा सतत ध्यास घ्याल. उधारी उसनवारी वसूल होईल. स्वसंपादीत धनाचा उपभोग घेता येईल. समाधान लाभेल.

**कुंभ :** व्यवसाय उद्योगाच्या निमित्ताने देशातील तसेच परदेशातील संस्थांशी संपर्क साधण्यात यशस्वी व्हाल. अनपेक्षित चांगल्या गोष्टी घडतील.

**मीन :** भावाबहिणींशी वागताना भावनिक उद्रेक होणार नाही याची दक्षता घ्या. जवळचे प्रवास सुखकर होतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८९५



### आडवे शब्द

१. राष्ट्रभाषेत शपथ
४. विक्रमवीर सचिनचे आडनाव
८. शिव! शिव!
१२. मर्यादा
१३. रम्य, सुंदर स्थान
१४. राज्यकारभाराचे प्रमुख शहर
१६. आंध्रच्या किनाऱ्यालगतचे बंदर
१८. उष्ण, १९. मला
२१. वेळ हिंदीत
२३. उघडणे
२५. गावातील टवाळ
२६. दात
२७. कबूतर
३०. वडिलांचा भाऊ
३१. रागाचे मोजमाप!
३२. ओलसर हवा
३४. वाळवी
३७. कायद्याप्रमाणे
३८. पैंजण
३९. ज्ञानेश्वर रचित प्रार्थना
४१. नाजूक
४३. गाडीचे पाय
४४. लागू पडल्यास नेमके औषध वा शब्द
४५. जाड दोर
४६. भूमीचे मार्दव सांगणारी कोंभाची हालचाल
४७. खोलवर नसलेले, वरपांगी
५०. एक अप्सरा
५१. आपमतलबी मंडळी हा देऊन कोहळा काढतात
५२. वसवलेली वस्ती
५५. उदा.हिरा, पाचू इ. प्रकार
५६. वजन, बोजा
५७. सूर्याचे एक नाव
५८. उगीच
६०. नगर, गाव
६२. पवित्र
६३. कौसल्यापुत्र
६५. मार्गस्थ
६६. घरातील मोठी माणसे
६८. पूर्वसूचना न देता
७१. 'कशाला उगाच' असा त्रास
७४. तापापूर्वी येणारे शहारे
७७. युवक
७८. या अभिनेत्रीने 'श्याम ची आई' अजरामर केली
७९. जादा कामाचा दिवस!

### उभे शब्द

१. खबदाड
२. सरळ लांब वासा
३. छेड काढणारा
५. बसल्याजागी लागलेली निद्रा
६. पांढुरका रंग
७. दारूचा एक प्रकार
८. दुर्लक्ष, हेळसांड
९. निच, विश्वासघातकी
१०. मातीचा कण
११. मालक, १५. पळणे
१६. अंजन
१७. आडमुठा, हट्टी
१९. चौथा हिस्सा
२०. वाटाण्याच्या ओल्या शेंगा
२१. शासनसंस्था, मंत्रीमंडळ
२२. माज
२४. भांडणात मध्यस्थी करणारा, २५. गवई
२७. तेच ते पुन्हा पुन्हा
२८. उणीव, कसर
२९. चिंतन
३०. मार्जारहत्या घडल्यास ही यात्रा करावी असा शास्त्रार्थ आहे
३१. बाळाचा मुका
३३. मऊशार हरळीसारखे कापड
३५. मिळमिळीत
३६. पृथ्वी
३७. शंकराचे एक नाव
४०. व्यवस्थापन
४१. कोमल, नाजूक, अपक्व
४२. चटकन
४३. एक पालेभाजी
४६. सीतेची जुळी मुले
४७. वाहन नेणे
४८. रममाण, निमग्न
४९. मांडणी
५३. मुलांचा एक बैठा खेळ
५४. घटस्फोट
५६. हमाल
५८. उलट, विरुद्ध
५९. फणसाचा एक प्रकार
६१. शंकर, प्रत्येक
६३. पौर्णिमा
६४. गळ्याभोवतीचे उबदार वस्त्र
६६. पहिला ऋतू
६७. रामबंधु
६९. कोवळी फांदी
७०. डुक्कर
७२. राबता, सवय
७३. दुबळा, गरीब
७५. पावसाची झड
७६. पडसे

### जम्बो शब्दकोडे क्र. ८९४ चे उत्तर

आडवे उत्तर : १.रामबाण ४.उभयता ७.गाजरपारखी ११.उशीर १२.गरज १३.जरतर १४.काहूर १५.नभ १८.वाह्यात २०.सरवा २२.मिशा २३.राबडी २४.रीस २५.मिठी २७.रमारम २९.तहहयात ३१अ.दाब ३२.सान ३३.मारवा ३५.माळ ३६.वसाहत ३८.कलागत ३९.कलाकार ४१.चलन ४२.सरडा ४३.वाटचाल ४५.चटकन ४७.नव ४८.नश्वर ५०.कलकलाट ५१.खास ५३.कालव ५४.परतपरत ५७.ललना ५८.दारू ६०.मटका ६१.तडक ६३.रखरख ६४.नागर ६७.बाप ६९.रक्षा ७२.कावरा–बावरा ७४.साखरी ७५.रवाळ ७६.टवाळी ७७.सजा

उभे उत्तर : १.राऊ २.मशी ३.बारकावा ४.उर ५.भाजप ६.तान ७.गाज ८.जरतारी ९.रत १०.पारवा १४.कळ १६.भर १७.खोडी १९.तनमनधन २१.रत्नाकर २४अ.सरबत २५.मित्र २६.देह २८.रमातल २९.तळतळात ३०.हस्तक ३१.तवका ३१अ.दाह ३३.मानस ३४.वाकडा–तिकडा ३५.माव ३७.सारवान ४०.लाटी ४१.चलनवलन ४४.टवका ४५.चटपट ४६.कशात ४९.रवाना ५०.कर्जदार ५१.खार ५२.सतत ५५.रकाना ५६.पगार ५९.रुखरुख ६०.मखर ६२.डरकाळी ६५.गरळ ६६.आरास ६७.बाव ६८.परात ७०.क्षार ७१.खाट ७३.बाजा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.



# “वने म्हणजेच जीवनाचा श्वास”

## जागतिक वन दिनी राज्यभर हरित संदेश

पुणे (दै. संध्या) :

जागतिक वन दिनानिमित्त “वने ही मानवी जीवनाचा श्वास आहेत” हा संदेश देत सुयश चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने महाराष्ट्रातील विविध भागांत व्यापक वृक्षसंवर्धन उपक्रम राबविण्यात आले. ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष यशवंत घैसास, स्मिता घैसास तसेच कार्याध्यक्षा शलाका घैसास यांनी याबाबत माहिती दिली.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जंगलांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे सांगताना त्यांनी वाढत्या प्रदूषणामुळे आणि वृक्षतोडीमुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधले. “प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन केले, तरच भविष्यातील पिढ्यांना शुद्ध हवा मिळेल,” असे आवाहन त्यांनी केले.

या उपक्रमाअंतर्गत पुणे, म्हसवाड, बीड, विंचुरवाडा, गडचिरोली आणि नंदुरबार या भागांमध्ये लावलेल्या वृक्षांचे संवर्धन करून, वृक्षारोपण, पर्यावरण आणि जंगलांचे रक्षण कसे करायचे याची मोहीम राबविण्यात आली. विशेष म्हणजे, केवळ झाडे लावण्यापुरतेच न थांबता त्यांचे संगोपन आणि जतन करण्यावरही भर देण्यात आला. स्थानिक ग्रामस्थ, स्वयंसेवक आणि पर्यावरणप्रेमी यांच्या सक्रिय सहभागामुळे हा उपक्रम प्रभावी ठरला. या वेळी लहानमूलांमध्ये पर्यावरणाबाबत जनजागृती करण्यात आली. लहान मुलांनीही उत्साहाने सहभाग घेत “आजचे रोप उद्याचा श्वास” हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला. जंगल हे अन्न, पाणी, हवा आणि संस्कृती जपते.

सुयश चॅरिटेबल ट्रस्टच्या या पुढाकारामुळे ग्रामीण भागातील वाडी, वस्ती, पाड्यांमध्ये हरित चळवळ उभी राहत असून पर्यावरण संवर्धनासाठी समाज एकत्र येण्याची गरज अधोरेखित झाली आहे. भविष्यातही अशा उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देण्याचा निर्धार ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

> “वने हीच आपल्या जीवनाची खरी शिदोरी आहेत. झाडे फक्त सावली देत नाहीत, तर ती पुढच्या पिढ्यांचा श्वास जपतात. म्हणूनच प्रत्येकाने एक झाड लावणे आणि त्याचे संगोपन करणे हीच खरी निसर्गसेवा आहे. वने वाचली तरच मानवजातीचे अस्तित्व सुरक्षित राहील.”
> — आदिवासी शेतकरी सुनील सिंगा तडवी

## थोडक्यात पण महत्वाचे...




### हिंदू तरुणींनी फसवणूकीपासून सावध व्हावे : महेश पवळे

पुणे (दैनिक संध्या) : "प्रेमाचे नाटक करून तरुणींना लग्नाचे आमिष दाखवत लव्ह जिहाद मध्ये अडकविले जात असल्याने त्यापासून सावध होण्याचे आवाहन "राजे शिवराय प्रतिष्ठान"चे संस्थापक महेश पवळे यांनी केले.कर्वेनगर येथील नटराज व गिरिजा शंकर वस्ती मधील नागरिकांसाठी स्वस्तिश्री सोसायटी द्वारा आयोजित सोसायटीच्या मैदानावर विराट हिंदू संमेलन आयोजित केले होते त्यावेळी महेश पवळे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले की,"हा एक सापळा असतो त्यात युवतींनी अडकता कामा नये त्यासाठी युवतींनी स्वसंरक्षणाचे धडे घेतले पाहिजे.सकल हिंदू समाज सशक्त व सामर्थ्यवान बनविण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील रहावे. हिंदू परंपरा,संस्कृती आणि मूल्यांचे संरक्षण,संवर्धन करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे राहून कार्य करावे."असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी सुप्रसिद्ध लेखिका व इतिहासकार सायली गोडबोले-जोशी यांनी पंच परिवर्तन संदर्भात मनोगत व्यक्त केले.यावेळी पुणे स्पोर्ट्स अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी मल्लखांब व योगासनाचे बहारदार प्रात्यक्षिके यावेळी करून दाखविली.कुटुंब प्रबोधन या विषयाला अनुसरुन सादर करण्यात आलेल्या भारुड आणि पथनाट्याला उपस्थितांनी दाद दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सुवर्णा बोडस यांनी केले.सोसायटीचे अध्यक्ष अॅड धनंजय खुर्जेकर यांनी प्रमुख पाहुण्याचा सत्कार केला.किरण कुलकर्णी यांनी आभार मानले. पुष्कराज सप्रे ह्यांनी गायिलेल्या वंदेमातरम ने कार्यक्रमाची सांगता झाली. ह्या विराट हिंदू संमेलनास कर्वेनगर मधील गिरिजा शंकर,नटराज सोसायटी मधील नागरिक,महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




### महावितरण तक्रार निवारण मंचात ग्राहक दिन साजरा

पुणे (दैनिक संध्या) : कसबापेठ येथील महावितरणच्या ग्राहक तक्रार निवारण मंचातर्फे मंगळवारी (दि. १७) जागतिक ग्राहक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जागतिक ग्राहक दिनाच्या निमित्ताने महावितरण ग्राहक तक्रार निवारण मंचाने उपस्थित नागरिकांना वीज ग्राहकांच्या हक्काची माहिती दिली. ग्राहक तक्रार निवारण व मंचाचे कामकाज याबद्दल मंचाचे अध्यक्ष श्री. महेंद्र दिवाकर, स्वतंत्र सदस्य् अरुण वाघमारे व सदस्य सचिव श्रीमती अपर्णा मुनशेट्टीवार यांनी यावेळी सखोल मार्गदर्शन केले. तसेच ग्राहकांना वीज सेवेबद्दल वारंवार पडणाऱ्या प्रश्नांची उदाहरणासहित असलेल्या छापील पुस्तिकेचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी ग्राहक, ग्राहक प्रतिनिधी, ग्राहक पंचायतीचे आजी-माजी पदाधिकारी आदींची उपस्थिती होती.

# डॉ. नीलम गोऱ्हेंचा शिवसैनिकांशी संवाद

## कार्यकर्त्यांनी मांडल्या प्रभागातील समस्या

पुणे (दै. संध्या) :

गुढीपाडवा व मराठी नववर्षाच्या शुभारंभाच्या निमित्ताने पुण्यात सिल्व्हर रॉक्स निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात उपसभापती व शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शिवसैनिकांशी मनमोकळा संवाद साधला. सर्व उपस्थित कार्यकर्त्यांनी आपापल्या प्रभागातील समस्या, संघटनेची बांधिलकी आणि पुढील कृतीयोजना यावर चर्चा केली.

डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गुढीपाडवा व मराठी नवीन वर्षाच्या शुभेच्छा देताना सांगितले की, “शिवसेना म्हणजे संघर्ष, शिवसेना म्हणजे जनतेची सेवा हा हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंचा मंत्र सर्वांनी आत्मसात करावा त्याचा विसर पडू देऊ नका. राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री व पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे साहेबांच्या नेतृत्वाखाली कल्याण-डोंबिवली, ठाणे महापालिकेसह राज्यभरात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेनेला घवघवीत यश मिळाले आहे. शिंदे साहेबांच्या निर्णयामुळे महिलांना महत्वाच्या पदांवर विराजमान होण्याची संधी मिळाली आहे. शिवसेना ही सर्वांना सामावून घेणारी संघटना आहे. सर्वांना सोबत घेऊनच पुढे जायचे आहे. पुण्यात मनासारखे यश मिळाले नसले तरी शिवसेनेने पुन्हा पुण्यात कामाचा शुभारंभ करणे गरजेचे आहे.



श्री रामनवमी, हनुमान जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीसह इतर सर्व सण मोठ्या उत्साहाने साजरे करावेत. प्रत्येक शिवसैनिकाने आपापल्या भागात सक्रिय राहून जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी झटावे.” असे नीलमताईंनी सांगितले. बैठकीत उपस्थित शिवसैनिकांनी डॉ. गोऱ्हे यांच्या मार्गदर्शनाचे स्वागत करताना सांगितले की, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांवर ठाम राहून व ना. एकनाथ शिंदे साहेबांच्या तत्पर कार्यपद्धती प्रमाणे काम करणे गरजेचे आहे. नव्या उत्साहाने पुन्हा विकास व प्रगतीसाठी मैदानात उतरण्यासाठी नव्या संकल्पाने पुढे जाण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी शहर संघटक आनंद गोयल, उपशहरप्रमुख संजय डोंगर, गायत्री भागवत, महेंद्र जोशी, मीनल धनवटे, अंजली दिघे, संतोष दिघे, सुलक्ष्मी धनकवडे, हिरामण धनकवडे, प्रदीप अवचिते, अॅड. स्नेहल जाधव, एकनाथ ढोले, तुषार भामरे, मीरा तुपेरे, माजी नगरसेवक राहुल तुपेरे, संगीता ठोसर, संजय तुरेकर, हेमंत बत्ते, , पवन बावसकर, माजी जिल्हापरिषद सदस्य शांताराम कटके, सायली पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

शहरात शिवसेना संघटना अधिक मजबूत होत असून, आगामी काळात जनतेच्या प्रत्येक प्रश्नावर तीव्र लढा देण्याची तयारी शिवसैनिकांनी दाखवली आहे.

## फुलगावमध्ये शाळेच्या जागेसाठी माजी आमदार दीपक पायगुडे यांचे धरणे आंदोलन नवव्या दिवशीही सुरू

पुणे (दै. संध्या) :

प्रशासनाकडून ठोस प्रतिसाद मिळाला नसल्याने माजी आमदार दीपक पायगुडे यांचे फुलगाव, पुणे येथील लोकसेवा प्रतिष्ठान संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी शाळेच्या मैदानातून जाणाऱ्या रस्त्याबाबत तसेच अतिक्रमणाबाबत धरणे आंदोलन सलग नवव्या दिवशीही सुरूच आहे. दीपक पायगुडे यांनी फुलगाव येथील शाळेच्या जागेच्या प्रश्नावर धरणे आंदोलन सुरू केले आहे. सरकारने शाळेची शैक्षणिक जागा रस्ता बांधकामासाठी ताब्यात घेतल्याच्या तसेच विविध भागात अतिक्रमण केल्याच्या निषेधार्थ त्यांनी आंदोलन सुरू केले होते. दीपक पायगुडे गेल्या नऊ दिवसांपासून फुलगावमधील शाळेच्या परिसरात धरणे आंदोलन करत आहेत. स्थानिक नागरिक आणि पालकांच्या मते, ही जागा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उपयोगासाठी राखीव होती. मात्र, रस्ता प्रकल्पासाठी ती घेण्यात आल्याने व अतिक्रमण केल्याने भविष्यात विद्यार्थ्यांच्या सुविधांवर परिणाम होणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या निर्णयाचा निषेध करत पायगुडे यांनी सरकारचे लक्ष वेधण्यासाठी धरणे आंदोलन सुरू केले आहे. मात्र नऊ दिवस उलटूनही प्रशासन किंवा सरकारकडून कोणतीही ठोस दखल घेण्यात आलेली नसल्याचा आरोप आंदोलकांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, धरणे आंदोलनामुळे दीपक पायगुडे यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे.

## पेप्सिकोचा जलसंधारणात मोठा वाटा; १४८ कोटी लिटर पाणी निसर्गाला परत

### ‘वॉटर अँड वॉश’ उपक्रमातून हजारो ग्रामस्थांना लाभ

पुणे (दै. संध्या) :

जागतिक जल दिनानिमित्त पेप्सिको इंडियाने जलसंधारण क्षेत्रातील आपली भक्कम कामगिरी अधोरेखित करत २०२५ मध्ये तब्बल १४८ कोटी लिटर पाणी निसर्गाला परत दिल्याची घोषणा केली आहे.

कंपनीने ‘पार्टनरशिप ऑफ प्रोग्रेस’ या संकल्पनेतून पाणी संवर्धन, भूजल पुनर्भरण आणि स्वच्छ पाणी उपलब्धतेवर लक्ष केंद्रित केले असून, विविध सामाजिक उपक्रमांद्वारे जलसुरक्षेला चालना दिली आहे.

पेप्सिकोचा ‘सस्टेनेबल वॉटर रिसोर्स डेव्हलपमेंट अँड मॅनेजमेंट’ (SWRDM) कार्यक्रम पंजाब, महाराष्ट्र (पुणे) आणि उत्तर प्रदेशमध्ये राबवला जात असून, पाणलोट क्षेत्र विकास आणि पावसाचे पाणी साठवण यावर भर दिला जात आहे.

या उपक्रमांमुळे ८९ हजारांहून अधिक ग्रामस्थांना लाभ झाला असून, जलस्रोत उपलब्धता, शाश्वत शेती आणि हवामान बदलांना तोंड देण्यासाठी मदत झाली आहे.

कंपनीने ‘सेफ वॉटर ॲक्सेस अँड वॉश’ उपक्रमांतर्गत ग्रामीण भागात स्वच्छ पाणी आणि स्वच्छता सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. मथुरामधील यशानंतर हा कार्यक्रम ३० गावांतील १ लाख नागरिकांपर्यंत विस्तारला जाणार आहे. पेप्सिको इंडिया आणि दक्षिण आशियाच्या कॉर्पोरेट अफेअर्स व सस्टेनेबिलिटी प्रमुख यशिका सिंग म्हणाल्या, “आमचा भर पाण्याचा कार्यक्षम वापर, पुनर्वापर आणि वापरलेले पाणी पुन्हा निसर्गाला परत देण्यावर आहे. स्थानिक समुदायांसोबत काम करत आम्ही जलसंधारण अधिक शाश्वत करण्याचा प्रयत्न करत आहोत.”




#### जलसुरक्षेसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न

पेप्सिकोचे उपक्रम पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि समुदाय सहभाग यांचा संगम साधत जलसंधारणाला चालना देत आहेत. यामुळे स्थानिक जलस्रोतांचे संरक्षण, शेतीला बळकटी आणि लोकांच्या जीवनमानात सुधारणा होत असल्याचे कंपनीने सांगितले.

# रिपब्लिकन पक्षाचा कार्यकर्ता मेळावा संपन्न

## रामदास आठवले यांच्या राज्यसभा निवडीबद्दल अभिनंदनाचा ठराव संमत

पुणे (दै. संध्या) :

रिपब्लिकन पक्ष (आठवले गट कार्यकर्ता मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी पुण्यातील नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला, तसेच केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची सलग तिसऱ्यांदा राज्यसभेवर निवड झाल्याबद्दल पक्षाच्या वतीने अभिनंदन ठराव पारित करण्यात आला.

या मेळाव्याला शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेवक नीलेश आल्हाट, नगरसेविका निशाताई मानवतकर, मोहन जगताप, महिपाल वाघमारे, संतोष आरडे, सुधीर वाघमोडे, माजी नगरसेवक जयदेव रंधवे, अर्जुन आल्हाट, आशिष भोसले, रवी अवसरमल, अक्षय अवसरमल, संतोष खरात, विनोद टोपे, संदीप धांडोरे, अविनाश गायकवाड, अविनाश कांबळे, अविनाश कदम, दिशा रणदिवे, मीनाज मोमिन, नीलेश रोकडे, यशवंत नडगम, शमसुद्दीन शेख, फिरोज खान, मुशताक शेख, रजाक सयद, अतुल भालेराव, बुद्धिशा रंधवे, उज्वला सर्वगोड,थोरात ताई,आदींसह साडेतीनशेहून अधिक कार्यकर्ते व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी इतर पक्षांतून रिपब्लिकन पक्षात दाखल झालेल्या कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पक्षवाढीसाठी स्थानिक पातळीवर नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करून त्यांना नियुक्तीपत्रे २२ मार्च रोजी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते प्रदान करण्याचे ठरले.




दरम्यान, महापालिका निवडणुकीनंतर पुणे शहरातील वाहतूक कोंडी, २४ तास समान पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा यांसारख्या प्रश्नांवर लक्ष वेधण्यात आले. पक्ष सत्तेत सहभागी असला तरी जनतेच्या समस्यांकडे दुर्लक्ष होऊ नये, यासाठी आवश्यक असल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. पुण्यातील नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर पाठपुरावा करण्याचा आणि प्रसंगी आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा निर्धार यावेळी पक्षाने व्यक्त केला.

## रुपाली चाकणकर मुख्य आरोपीशी संगनमत साधून हे सगळं करत होत्या

पुणे (दै. संध्या) :

महिलेचं लैंगिक शोषण केल्याच्या प्रकरणात कॅप्टन अशोक खरात या स्वयंघोषित बाबाला पोलिसांनी अटक केली. यानंतर कॅप्टन अशोक खरात आणि महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचे फोटो व्हायरल झाले. या फोटोंमध्ये रुपाली चाकणकर या अशोक खरातसाठी छत्री धरताना दिसत आहेत. दुसऱ्या एका फोटोत त्याची पाद्यपूजा करताना दिसत आहेत. यावरुन गदारोळ माजल्यानंतर रुपाली चाकणकर यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला. या सगळ्या गोष्टी घडल्यावर आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या नेत्या रुपाली ठोंबरे पाटील यांनी आक्रमक भूमिका मांडली आहे. तसंच काही धक्कादायक दावेही केले आहेत. मी पक्षातली आहे म्हणून आरोप करत नाही. मी वकील म्हणून हे सगळे आरोप करते आहे. कारण चाकणकर या भोंदूबाबा अशोक खरातच्या सेक्स रॅकेटच्या त्या मुख्य सूत्रधार आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायद्यानुसार जो तपास समोर आला आहे त्यानुसार ही मागणी करते आहे की रुपाली चाकणकरांना अटक करावी. कारण चाकणकरांना सगळं माहीत असून त्यांनी दडपशाही केली. अत्यंत गंभीर आणि महाराष्ट्रातील खूप मोठं सेक्स स्कँडल आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष असलेल्या रुपाली चाकणकर मुख्य आरोपीशी संगनमत साधून हे सगळं करत होत्या.

## महिला दिनानिमित्त “गौरव तीच्या कर्तृत्वाचा” कार्यक्रम उत्साहात संपन्न




पुणे (दै. संध्या) :

महिला दिनाचे औचित्य साधून डॉ. दुधभाते नेत्रालय व आदित्य फाउंडेशन यांच्या तर्फे “गौरव तीच्या कर्तृत्वाचा” या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजाच्या प्रगतीसाठी मोलाचे योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात सौ. राधिका जहागिरदार, डॉ. अपर्णा देशमुख आणि सौ. अनिता देवकर यांना “क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार” प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांच्या कार्याची दखल घेत उपस्थितांनी त्यांचे विशेष कौतुक केले. या प्रसंगी डॉ. दुधभाते नेत्रालयाचे सर्वेसर्वा डॉ. अनिल दुधभाते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त पोलिस सहायक आयुक्त रुक्मिणीताई गलांडे होत्या. तसेच महानगरपालिका नगरसेविका ज्योतीताई गोसावी, धनश्रीताई कोल्हे, विखे वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक डॉ. राम पडळकर, दत्ताभाऊ कोल्हे, आसावरी चव्हाण, साहित्यिक गिरीश वसेकर, डॉ. स्नेहल मानपुत्र, शितल हिरळकर, गौरी निमकर, कोमल भोसले व अनुराग क्षीरसागर यांच्यासह डॉ. दुधभाते नेत्रालयाचा संपूर्ण कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करत समाजात प्रेरणादायी संदेश देण्यात आला.

# तुळशीबाग राम मंदिरातील स्वर मैफलीत रसिकांना ‘ध्यान लागले रामाचे’

## गायिका सानिका कुलकर्णी यांचे गायन ; श्री रामजी संस्थान तुळशीबाग तर्फे श्रीरामनवमी उत्सव ; उत्सवाचे २६५ वे वर्ष

पुणे (दै. संध्या) :

ठुमक चलत रामचंद्र... राम रतन धन पायो...ध्यान लागले रामाचे... यांसह प्रभू श्रीरामांचे वर्णन करणाऱ्या विविध गीतांचा आनंद घेताना रसिकांनी जणू श्रीरामांचे ध्यान लागले. पेशवेकालीन ऐतिहासिक तुळशीबाग श्रीराम मंदिरात आयोजित स्वरमैफलीत गायिका सानिका कुलकर्णी यांच्या गायनाने पुणेकरांना मंत्रमुग्ध केले. श्री रामजी संस्थान तुळशीबाग च्यावतीने श्रीराम मंदिरात श्रीरामनवमी उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सवाचे अखंडीत २६५ वे वर्ष साजरे होत आहे. संस्थानचे कार्यकारी विश्वस्त डॉ.रामचंद्र तुळशीबागवाले, विश्वस्त भरत तुळशीबागवाले, रामदास तुळशीबागवाले, श्रीपाद तुळशीबागवाले, कोटेश्वर तुळशीबागवाले यांसह तुळशीबागवाले परिवाराने उत्सवाचे आयोजन केले आहे. 'वंदे गणपतीम' या गणेश वंदनेने मैफलीला प्रारंभ झाला. त्यानंतर 'रूप पाहता लोचनी' या संत ज्ञानेश्वरांच्या अभंगाचे सानिका कुलकर्णी यांनी केलेले सादरीकरण रसिकांच्या विशेष पसंतीस पडले. 'जानकी नाथ सहाय करे जब' या भजनाला उपस्थितांनी टाळ्यांनी साथ दिली. संत तुकाराम महाराजांच्या 'लक्ष्मी वल्लभा' या रचनेच्या सादरीकरणाने पुणेकर मंत्रमुग्ध झाले. डॉ.रामचंद्र तुळशीबागवाले म्हणाले, पुणे प्रांताचे सरसुभेदार श्रीमंत नारो अप्पाजी तुळशीबागवाले यांनी सन १७६१ साली स्थापन केलेले हे देखणे मंदिर आहे. यंदा दि. २ एप्रिल पर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सवांतर्गत श्रीरामरक्षा, अथर्वशीर्ष पठण, श्री विष्णू सहस्त्रनाम, श्रीसूक्त व पुरुषसूक्त पठण, महापूजा, पालखी, श्री कौसल्या माता डोहाळजेवण, श्रीरामजन्म सोहळा, श्रीरामराज्याभिषेक सोहळा अशा धार्मिक कार्यक्रमांबरोबरच रामायण वाचन, रामायण प्रवचन, सांगितीक कार्यक्रम अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात आले आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे...



### राजगुरुनगर येथे रमजान ईद उत्साहपूर्ण वातावरणात साजरी

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : राजगुरुनगर येथे रमजान ईद (ईद-उल-फित्र) मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. येथील प्रसिद्ध ऐतिहासिक दिलावर खान दर्गा मैदानावर आज सकाळी ८.३० वाजता राजगुरुनगर व परिसरातील हजारो मुस्लिम बांधव एकत्र येऊन ईदची नमाज अदा केली. नमाजानंतर सर्वांनी एकमेकांना आलिंगन देत ईदच्या शुभेच्छा दिल्या. मुस्लिम समाजात रमजान महिन्याला विशेष महत्त्व असून या महिन्याला इतर महिन्यांचा 'सरदार' असे संबोधले जाते. या पवित्र महिन्यात प्रत्येक मुस्लिम बांधवाच्या घरी धार्मिक वातावरण असते. तीस दिवस सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत रोजा (उपवास) पाळला जातो आणि विशेष नमाज अदा केली जाते. उर्दू शव्वाल महिन्याच्या पहिल्या दिवशी ईद साजरी केली जाते. चंद्रदर्शन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी मुस्लिम बांधव ईदची नमाज अदा करण्यासाठी दर्गा मैदानावर एकत्र येतात. यावेळी मशिदीचे प्रमुख मौलाना मुस्तकिम यांनी उपस्थितांना रमजानचे महत्त्व सांगत नमाज अदा केली. शहरातील विविध मशिदींचे मौलाना व मान्यवरही उपस्थित होते. मौलाना यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, ईदचा आनंद साजरा करताना परमेश्वराला विसरू नका, अल्लाहसमोर नतमस्तक व्हा आणि रमजानचे रोजे करण्याची संधी दिल्याबद्दल आभार माना. तसेच नमाजपूर्वी जकात (दान) करणे ही महत्त्वाची आर्थिक उपासना असल्याचे त्यांनी सांगितले. रमजान ईद निमित्त मुस्लिम युवक फ्रेंड सर्कलतर्फे शहरातील मोमीन आळी येथे ईद मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात शहरातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तसेच सर्व धर्मीय नागरिक सहभागी झाले. सर्वांनी एकमेकांना शुभेच्छा देत शिरखुर्म्याचा आस्वाद घेतला.

### शहीद दिनानिमित्त राजगुरुनगर येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : २३ मार्च शहीद दिनाचे निमित्ताने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा देवेंद्रजी फडणवीस सांस्कृतिक व पर्यटन केंद्र मंत्री गजेंद्र सिंग शेखावत मा एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मा सुनेत्राताई पवार उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य आणि ॲड. आशिष शेलार सांस्कृतीक माहिती तंत्रज्ञान मंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे आणि नगरपरिषद राजगुरुनगर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य सांस्कृतिक कार्यक्रम आणि स्वातंत्र्य संग्रामावर आधारित भव्य प्रदर्शन मंगळवार दिनांक २४ मार्च २०२६ रोजी शालीमार पॅलेस याठिकाणी आयोजित केलेले आहे. सदरील कार्याक्रमात देशभक्तीची गाणी, नाट्य, कला आणि इतिहासाचा जिवंत अनुभव अनुभवयास मिळणार असून आपल्या पुढील पिढीसाठी प्रेरणादायी क्षण देण्याचा प्रयत्न होणार आहे. सदरच्या कार्यक्रमासाठी प्रवेश पूर्णपणे विनामूल्य असून आपली उपस्थितीच देशभक्तीला खरी सलामी ठरेल! अशी माहिती राजगुरुनगर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ, उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर व मुख्याधिकारी अंबादास गर्कळ यांनी दिली.

### "नातेसंबंध आदरावर उभे राहायला हवेत, व्यवहारांवर नव्हेत."



पुणे (दैनिक संध्या) : झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'गंगा माई की बेटियाँ'मध्ये शिझान खान (सिद्धू) आणि अमनदीप सिद्धू (स्नेहा) मुख्य भूमिकेत आहेत. ही मालिका समाजातील कठोर वास्तविकता दर्शवणाऱ्या मुद्द्यांवर सातत्याने प्रकाश टाकत आली आहे. मुलगाच व्हायला पाहिजे या चुकीच्या अपेक्षेपासून ते स्त्रियांना केवळ त्यांच्या लैंगिकतेमुळे भोगाव्या लागणाऱ्या अडचणींपर्यंत अनेक प्रश्न ही मालिका प्रभावीपणे मांडते. शक्तिशाली कथाकथनामुळे ही मालिका प्रेक्षकांच्या मनाला भिडली आहे. 'गंगा माई की बेटियाँ' मालिकेत हल्लीच पार पडलेल्या ट्रॅकमध्ये हुंड्यासारख्या खोलवर रुजलेल्या सामाजिक कलंकावर प्रकाश टाकण्यात आला आहे. ही कथा भावनिक वळण घेते, जेव्हा गंगा माई (शुभांगी लाटकर) हिला सहानाच्या (सृष्टी जैन) सासूने केलेल्या प्रचंड मागणीसाठी आपले घर तारण ठेवावे लागते. अभिनेत्री शुभांगी लाटकर सांगतात की हुंडा हा अजूनही गंभीर सामाजिक प्रश्न असला तरी अशा गहन प्रसंगांचे सादरीकरण करणे हे कलाकारासाठीही तितकेच आव्हानात्मक असते. शुभांगी म्हणाल्या, "एक अभिनेत्री म्हणून मी तिची असहाय्यता आणि तिची आंतरिक ताकद असे दोन्हीही प्रामाणिकपणे दाखवण्याचा प्रयत्न करते. असे प्रसंग दाखवताना समाजातील दबाव किती खोलवर रुजलेला असू शकतो याची जाणीव पुन्हा होते. त्याच वेळी तिचा प्रवास धैर्य आणि बदलाची आशा दाखवतो."

### उन्हाचा तडाखा वाढला; तरुणाईचा पोहण्याकडे ओढा



नीरा (दैनिक संध्या) : ग्रामीण भागात सध्या उन्हाचा तडाखा तीव्र झाला असून तापमानात मोठी वाढ झाली आहे. या उष्णतेपासून दिलासा मिळवण्यासाठी परिसरातील तरुणाई आता दुपारच्या वेळेत विहिरी, नद्या आणि कालव्यांमध्ये पोहण्याचा आनंद घेताना दिसत आहे. पुरंदर तालुक्यातील पिंपरे खुर्द परिसरात नीरा डाव्या कालव्यावर दुपारच्या सुमारास पोहण्यासाठी तरुणांची मोठी गर्दी होत आहे. मागील काही दिवसांपासून उष्णतेचा जोर वाढल्यामुळे अनेक नागरिक थंडावा मिळवण्यासाठी पाण्याकडे वळले आहेत. विशेषतः वीर धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे नीरा डावा व उजवा कालवा सध्या पाण्याने भरलेला असून, त्याचा फायदा तरुणाई घेत आहे. जेजुरी, मांडकी, पिंपळे आणि नीरा परिसरातील युवक मोठ्या संख्येने कालव्यावर पोहण्यासाठी येत आहेत. काही ठिकाणी पालकही आपल्या मुलांना पोहायला शिकवताना दिसत आहेत. दहावी व बारावीच्या परीक्षा संपल्याने विद्यार्थ्यांना मोकळा वेळ मिळाला असून, हा वेळ ते पाण्यात खेळत घालवत आहेत. "दहावीची परीक्षा संपल्यानंतर आता भरपूर वेळ मिळाला आहे. वर्षभर खेळांपासून दूर राहावे लागले. त्यामुळे आता सुट्टीत मित्रांसोबत कालव्यात पोहण्याचा आनंद घेत आहोत," असे संस्कार शिंदे (नीरा) या युवकाने सांगितले. उन्हाच्या तीव्रतेतून काहीसा दिलासा मिळवण्यासाठी नागरिकांचा पाण्याकडे वाढलेला ओढा स्पष्टपणे दिसून येत आहे. मात्र, अशा ठिकाणी पोहताना सुरक्षिततेची काळजी घेण्याचे आवाहनही नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# एकविसाव्या शतकातही सुरू असलेली युद्ध दुर्दैवी

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे प्रतिपादन




**पुणे (दै. संध्या) :**

सध्या जगभरात युद्धग्रस्त परिस्थिती असल्याचे आढळून येत आहे. एकविसाव्या शतकातही सुरू असलेली युद्ध दुर्दैवी असून या परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'युद्ध नको, बुद्ध हवा', हा संदेश जगासाठी उद्बोधक आहे, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.

पद्मपाणी फाउंडेशन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पाली व बौद्ध अध्ययन विभाग यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या पाली साहित्य संमेलनाचे उद्घाटन आठवले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संमेलनाध्यक्ष बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या पाली विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. बिमलेन्द्र कुमार, गगन मलिक, भदंत हर्षबोधि महाथेरो, डॉ योजना भगत, उपमहापौर परशुराम वाडेकर, धम्मदीप वानखेडे, डॉ. करुणा जाधव, डॉ नीरज बोधी, सारंग आव्हाड, स्वागताध्यक्ष डॉ सिद्धार्थ धेंडे, डॉ. गौतम चाबुकस्वार, संयोजक राहुल डंबाळे, सुवर्णा डंबाळे, आरपीआयचे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे आदी मान्यवर उपस्थित होते.

पाली भाषेने जगाला ज्ञान प्रदान केले आहे. विज्ञानवाद, समानता, मानवता आणि शांततेचे ज्ञान, बौद्ध तत्त्वज्ञान पाली भाषेतूनच जगभरात पोहोचले आहे. पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी आपण प्रयत्न केले असून यापुढे पाली भाषेचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणावर व्हावा यासाठी शासकीय पातळीवर सर्व प्रकारची मदत करू, अशी ग्वाही आठवले यांनी यावेळी दिली. जगभरातील युद्धस्थिती, समाजातील असमानता, हिंसाचार दूर करण्यासाठी पाली भाषेचा प्रसार आवश्यक असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान आणि समृद्ध भारतीय परंपरेचे भांडार पारिभाषेत उपलब्ध असून दुःखातून बाहेर पडून समाधान प्राप्त करण्याचा, चित्तशुद्धीचा मार्ग पाली भाषाने दाखवला आहे.

त्यामुळे शालेय अभ्यासक्रमापासून पालीचा समावेश ऐच्छिक भाषा म्हणून होणे आवश्यक आहे, असे मत बिमलेंद्र कुमार यांनी व्यक्त केले. बौद्ध तत्त्वज्ञानाप्रमाणेच सामाजिक, आर्थिक, राजनैतिक अशा सर्व विषयांवरील व्यापक साहित्य पाली भाषेत उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असला तरी त्याचे संवर्धन व प्रसार व्हावा यासाठी कोणताही कार्यक्रम हाती घेण्यात आला नाही. राष्ट्रीय संस्कृत संस्थानच्या धर्तीवर पाली भाषेच्या संवर्धनासाठी राष्ट्रीय विद्यापीठ किंवा संस्थेची स्थापना करण्यात यावी. महाविद्यालयांमध्ये पाली भाषेच्या प्राध्यापकांची अनेक पदे रिक्त असून ती ताबडतोब भरण्यात यावी, अशा मागण्याही त्यांनी यावेळी केल्या.

सध्याच्या काळात केवळ पाली भाषाच नव्हे तर बौद्ध धम्म धोक्यात आला असल्याची भीती गगन मलिक यांनी आपल्या भाषणात व्यक्त केली. सर्वसामान्यांना ज्ञान देण्याची जबाबदारी असलेल्या प्रथम पाली भाषेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. बौद्ध धर्माचे संवर्धन व प्रसार करणाऱ्या भिक्षूची संख्या मर्यादित आहे. समाजातील सुशिक्षित आणि कर्तृत्ववान युवक भिक्षू होण्यास तयार नाहीत, अशी खंत व्यक्त करतानाच मलिक यांनी भिक्षू होण्याची तयारी असलेल्या युवकांच्या थायलंड मधील पंधरा वर्षाच्या प्रशिक्षणाची संपूर्ण जबाबदारी घेण्याची तयारी देखील दर्शविली.

पाली भाषा ही माणसांना जोडणारी, मैत्रीची आणि परिवर्तनाची भाषा असल्याचे भदंत हर्षबोधी महाथेरो यांनी नमूद केले. बौद्ध धर्माचा, गौतम बुद्धांच्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाचा, विचाराचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी भिख्खू संघाने एकत्र येऊन पुढाकार घेण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. पाली भाषेतील समृद्ध साहित्य सर्व भारतीय भाषांमध्ये अनुवादित केले जावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे चिवर धारण न केलेले संन्यासी होते, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

पाली भाषेच्या प्रचार आणि प्रसाराची जबाबदारी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी हाती घेतली पाहिजे, असे आवाहन सुवर्ण डंबाळे यांनी प्रास्ताविकात केले. यावेळी डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी पाली भाषेच्या प्रसारासाठी निधी मिळावा आणि प्राथमिक शिक्षणात पाली भाषेचा समावेश करावा, अशा मागण्या केल्या. राहुल डंबाळे यांनी पाली भाषेच्या ऑनलाइन प्रशिक्षणासाठी प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्याची तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे समग्र साहित्य पालीमध्ये अनुवादित करण्याची घोषणा यावेळी केली. साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सत्रात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली व बौद्ध अध्ययन विभागाचे विभाग प्रमुख डॉ. महेश देवकर यांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आले. त्याचप्रमाणे पाली भाषेच्या संवर्धनासाठी प्रयत्न करणारे गायक पावा, गगन मलिक, अतुल भोसेकर आणि संमेलन अध्यक्ष बीमलेन्द्र कुमार यांचाही सत्कार करण्यात आला.

# शहीद दिनानिमित्त सायकलिंग रॅलीचे आयोजन

**राजगुरुनगर (दै. संध्या) :**



शहीद दिनानिमित्त राजगुरूनगर नगरपरिषद यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली सायकलिंग रॅली उत्साहात व यशस्वीरित्या संपन्न झाली. या स्पर्धेला नागरिकांचा आणि युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेत विविध वयोगटांतील सुमारे एक हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.

स्पर्धेचे उद्घाटन राजगुरुनगर चे प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्ष श्री.मंगेश गुंडाळ यांच्या हस्ते करण्यात आले होते. यावेळी उपनगराध्यक्ष श्री. मनोहर सांडभोर व सर्व नगरसेवक उपस्थित होते.

ही स्पर्धा दि. २२ रोजी राजगुरूनगर बसस्थानक येथील हुतात्मा राजगुरू, भगतसिंग, सुखदेव स्मृतीशिल्प येथून प्रारंभ करण्यात आली. सुमारे १३ कि.मी मार्ग असलेली

रॅली वाडा रोड मार्गे पांगरी बुट्टेवाडी सातकर स्थळ रोड मार्गे कोहिणकरवाडी मार्गे तिन्हेवाडी रोड मार्गे पंचायत समिती चौक वाडा रोडची पाण्याची टाकी केदारेश्वर नवीन पूल राजगुरू वाडा जवळील पुलावरून हु.राजगुरु वाडा येथे सांगता करण्यात आली.

समारोपानंतर विजेत्यांना रोख पारितोषिक, व सर्व सहभागी स्पर्धकांना पदक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे:

प्रथम क्रमांक: ओम कोन्हाळे (खुला गट) सृष्टी पांडुरंग बोंबले(महिला गट)

द्वितीय क्रमांक: पांडुरंग बोंबले(खुला गट) मनस्वी राजपूत (महिला गट)

तृतीय क्रमांक: आराध्य राऊत (खुला गट) वैष्णवी थिगळे (महिला गट)

या स्पर्धेमुळे नागरिकांमध्ये शहीद राजगुरू, भगतसिंग, सुखदेव यांचे विचार आजच्या पिढीमध्ये रुजवण्यासाठी व सायकल वापरून आरोग्या विषयी जागरूकता होण्यास मदत झाली आहे. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी सायकल रॅली समिती मधील नगरसेवक सदस्य श्री.वैभव घुमटकर, श्री.अमोल वाळुंज, श्री. दिनेश सांडभोर श्री. मित्रसेन डोंगरे, श्री.सागर सातकर, सौ.स्नेहल राक्षे व नगर परिषदेचे मुख्याधिकारी श्री. अंबादास गर्कळ यांच्या मार्गदर्शनाखाली कर निरीक्षक जगदीश नागलोत, रचना सहायक मयुर आगरकर, सभा अधिक्षक स्वाती आरोटे, लिपिक गणेश देव्हरकर व ईतर सर्व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## 'घरवाली पेडवाली'मध्ये नवी एन्ट्री; अंकित मोहन यक्षच्या भूमिकेत

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**



एण्ड टीव्हीवरील हलकी-फुलकी कौटुंबिक विनोदी मालिका घरवाली पेडवाली रोमांचक ट्विस्ट्स, भावना व विनोदासह प्रेक्षकांना अचंबित करत आहे. कथानकामध्ये नवीन अलौकिक रहस्याची भर घालण्यास येत आहेत प्रतिभावान व बहुआयामी अंकित मोहन, जे मालिकेमध्ये मॅडी नावाच्या मानवी रूपातील रहस्यमय भूत यक्षच्या भूमिकेत मालिकेमध्ये प्रवेश करत आहेत. त्यांच्या भूमिकेमध्ये सस्पेंस, विनोद व भावनिक सखोलतेचे लक्षवेधक मिश्रण आहे, तसेच त्याचे लतिकाच्या (प्रियमवदा कांत) गतळाशी दृढ संबंध आहे. या मालिकेमध्ये सामील होण्याबाबत सांगताना अभिनेते अंकित मोहन ऊर्फ यक्ष/मॅडी म्हणाले, मी पहिल्यांदा या भूमिकेबाबत ऐकले तेव्हा माझे त्वरित या भूमिकेने लक्ष वेधले, कारण या भूमिकेमध्ये अनेक पैलू आहेत. मॅडी जीतूचा मित्र म्हणून कथानकामध्ये प्रवेश करतो, जो अत्यंत मोहक, मनमिळाऊ व परिपूर्णपणे सामान्य आहे. त्या मानवी रूपाखाली यक्ष लपलेला आहे, जो एक भूत असून त्याचा लतिकाचा गतकाळाशी दृढ संबंध आहे. या दुहेरी पैलूने अभिनेता म्हणून माझे लक्ष वेधून घेतले आहे. मालिका घरवाली पेडवालीमध्ये कॉमेडी, काल्पनिकता व भावनांचे अद्भुत मिश्रण आहे आणि अलौकिक शक्ती व मानवी विश्व यांच्यामध्ये असलेली ही भूमिका साकारणे अत्यंत आव्हानात्मक व उत्साहवर्धक आहे.



## 'जाने अनजाने हम मिले'मध्ये राघववर अत्याचार; भरत अहलावतचा थरारक अनुभव

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'जाने अनजाने हम मिले' मध्ये भरत अहलावत (राघव) आणि आयुषी खुराणा (रीत) हे मुख्य भूमिकांमध्ये असून आता मालिकेमध्ये राघववर चित्रीत केले जाणारे काही तीव्र आणि धक्कादायक प्रसंग पाहायला मिळणार आहेत. कथानकाच्या आगामी भागांमध्ये राघववर कृतिच्या खुनाचा आरोप ठेवत त्याला जेलमध्ये टाकण्यात येते. ही आगामी दृश्ये जबर असतील कारण या दृश्यांमध्ये त्याचा जबर मानसिक आणि शारीरिक छळ केला जातो. यातील एका दृश्यात पोलिस त्याच्याकडून कबुली वदवून घेण्यासाठी त्याला खऱ्या बर्फाच्या लादीवरही झोपायला भाग पाडतात. हे प्रसंग पडद्यावर अतिशय प्रभावी दिसत असले तरी प्रत्यक्ष चित्रीकरणादरम्यान भरतसाठी हे मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या अत्यंत थकवणारे ठरले कारण या दृश्यांसाठी त्याला थेट बर्फाच्या लादीवर उघड्या अंगाने त्या प्रचंड थंडीचा सामना करत अभिनय करावा लागला.

या सीक्वेन्सच्या चित्रीकरणाचा अनुभव सांगताना भरत म्हणाला की एका क्षणी त्याला खरंच त्याचा मेंदू काम करणे बंद झाल्यासारखे वाटले. तो म्हणाला, "माझ्यासाठी हा खूप वेगळा अनुभव होता. अशा प्रकारचे दृश्य मी यापूर्वी कधीच केले नव्हते. जेलमधील अत्याचाराचे हे दृश्य पूर्णपणे नवीन आणि आव्हानात्मक होते. जेव्हा मी हा सीन पहिल्यांदा वाचला, तेव्हा एक कलाकार म्हणून इतकं हटके काहीतरी करण्याची संधी मला मिळतेय याची उत्सुकता मला वाटली. हे दृश्य फार मोठे नव्हते पण त्याची तीव्रता खूप जास्त होती. यातील सर्वांत कठीण भाग म्हणजे बर्फाच्या लादीवर झोपणे. खाली फक्त एक पातळ शीट होती, जी हालचालींमुळे सारखी घसरत होती. शिवाय ह्या दृश्यामध्ये संघर्ष आणि दिल्या जाणाऱ्या यातनांवर प्रतिक्रिया देणे अपेक्षित असल्यामुळे शरीर स्थिर ठेवत योग्य मर्यादा राखणे खूपच अवघड जात होते." तो पुढे म्हणाला, "चित्रीकरणानंतर याचा माझ्या शरीरावर खरा परिणाम जाणवला. माझी त्वचा लालसर झाली होती आणि एका क्षणी प्रचंड थंडी आणि अस्वस्थतेमुळे माझा मेंदू जणू काम करेनासा झाला होता. पण अभिनेता म्हणून हा संपूर्ण प्रक्रियेचा एक भाग आहे.

एकूणच हे दृश्य खूप आव्हानात्मक होते तरीही मला तो करताना मला खूप मजा आली. चित्रीकरण खूप छान झाले आहे आणि मला आशा आहे की प्रेक्षकांनाही ते दृश्य चांगले वाटेल आणि ते त्याचे कौतुक करतील."

# एण्ड टीव्हीवरील कलाकारांनी ईद साजरी करण्याच्या योजनांबाबत सांगितले!

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**






ईद हा कृतज्ञता, एकात्मता आणि एकमेकांसह आनंद शेअर करण्याच्या भावनेचा आनंददायी सण आहे, जो आपल्यासोबत आपुलकी, उत्सवाचा उत्साह आणि स्वादिष्ट मेजवानी घेऊन येतो. या सणाला नमाज केला जातो, प्रियजनांसोबत सणाचा आनंद घेतला जातो आणि सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते. एण्ड टीव्हीवरील कलाकारांसाठी ईद सण फक्त विधी नसून सेटवर व सेटबाहेर विशेष क्षण निर्माण करण्याबाबत आहे, जेथे ते त्यांच्या कामावरील दुसऱ्या कुटुंबासोबत उत्साहात व आनंदात सण साजरा करतात. या सणाबाबत गोड आठवणी आणि सण साजरा करण्याच्या योजनांबाबत सांगत आहेत आसिफ शेख (मालिका भाबीजी घर पर है 2.0मधील विभुती नारायण मिश्रा) आणि सलिम झैदी (मालिका भाबीजी घर पर है 2.0मधील टिल्लू). मालिका भाबीजी घर पर है 2.0मध्ये विभुती नारायण मिश्राची भूमिका साकारणारे आसिफ शेख म्हणाले, ईद माझ्यासाठी अत्यंत विशेष व भावूक क्षण आहे, ज्यामध्ये प्रेम, कृतज्ञता आणि एकता समावलेली असते. मला आजही माझ्या बालपणीच्या आठवणी आठवतात. मी सकाळी नमाज करत सण साजरा करायला सुरूवात करायचो, ज्यानंतर मोठ्यांचा आशीर्वाद घ्यायचो आणि घरामध्ये मोठ्या मेजवानीचा मनसोक्त आस्वाद घ्यायचो. शीरखुर्मा, बिर्याणी व कबाब यांसारखे स्वादिष्ट खाद्यपदार्थ नेहमी खास आकर्षण असायचे. गेल्या काही वर्षांमध्ये साजरीकरण मोठे झाले आहे, आता मी फक्त कुटुंबासह नाही तर मित्र व सहकाऱ्यांसोबत देखील सण साजरा करतो. यंदा, मी घरामध्ये मित्रांसोबत लहानसे गेट-टूगेदर करणार आहे आणि मी सेटवर माझ्या सह-कलाकारांसाठी स्पेशल ईद मेजवानी देण्यासाठी उत्सुक आहे. आम्ही सेटवर एकत्र खूप वेळ व्यतित करतो, ज्यामुळे ते दुसरे कुटुंब असल्यासारखे वाटते. त्यांच्यासोबत साजरीकरणाचा आनंद घेताना सण अधिक संस्मरणीय होऊन जातो. माझ्यासाठी ईद म्हणजे आनंद पसरवणे, नाते पक्के करणे आणि आसपासच्या सर्वांमध्ये आनंद पसरवणे. मालिका भाबीजी घर पर है 2.0मध्ये टिल्लूची भूमिका साकारणारे सलिम झैदी म्हणाले, ईद म्हणजे उत्साह, आनंद आणि तुम्हाला आवडणाऱ्या व्यक्तींसोबत वेळ व्यतित करणे. मला आठवते, बालपणी मी नवीन पोशाख परिधान करायचो, ईदी गोळा करायचो आणि दिवसभर मित्र व नातेवाईकांना भेट द्यायचो. मला आवडणारी परंपरा म्हणजे मित्रांना भेटणे आणि शेवियां व शीर खुर्मा यांसारख्या उत्सवी स्वादिष्ट खाद्यपदार्थांचा मनसोक्त आस्वाद घेणे. आजही मी ईददरम्यान वेळात वेळ काढून माझ्या जिवलग मित्रांना भेटतो, कारण ही पुन्हा एकत्र भेटण्यासाठी परिपूर्ण वेळ आहे. यंदा, मी घरी व सेटवर सण साजरा करणार आहे. मी सेटवर घरी बनवलेले गोड पदार्थ आणणार आहे आणि संपूर्ण टीमसोबत ईद सण साजरा करणार आहे, तसेच उत्सवी खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासोबत धमाल करणार आहे. सेटवर माझ्या दुसऱ्या कुटुंबासोबत हे क्षण शेअर करताना खूप अद्भुत वाटते.

माझ्यासाठी ईद म्हणजे कृतज्ञता, उदारता आणि आसपास सर्वांसोबत उत्साहवर्धक आठवणी निर्माण करणे.

धमालपूर्ण मनोरंजन पाहायला विसरू नका आणि पाहत राहा मालिका भाबीजी घर पर है 2.0 दर सोमवार ते शुक्रवार रात्री 10.30 वाजता फक्त एण्ड टीव्हीवर. तसेच सर्व एपिसोड्स कधीही पहा हिंदी झी5 वर!

## थोडक्यात पण महत्वाचे...




### निगडी-आकुर्डी दरम्यान मेट्रोच्या कामामुळे रस्त्यावर चिखल; अपघाताचा धोका वाढला

पिंपरी (दैनिक संध्या) : निगडी चौक ते आकुर्डी परिसरात सुरू असलेल्या मेट्रो रेलच्या कामांमुळे रस्त्यावर माती व मुरुम मोठ्या प्रमाणात सांडला असून त्यातून चिखल निर्माण झाला आहे. यामुळे रस्त्यावरून दुचाकी घसरत असून अपघाताची शक्यता वाढली आहे. स्थानिक नागरिकांकडून याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. सदर परिस्थिती लक्षात घेता मेट्रो प्रशासनाने तातडीने योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. रस्त्यांवरील माती तात्काळ हटवून नियमित साफसफाई आणि पाणी मारण्याची आवश्यकता असल्याचेही सांगितले जात आहे. दरम्यान, मेट्रो अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. तसेच, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशामक विभागाने मेट्रो प्रशासन तसेच महापालिका आरोग्य व स्वच्छता विभागाच्या रोड क्लिनर व्हेईकल आणि रोड वॉशर व्हेईकल यांना संपर्क साधण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तात्काळ उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.



### वाहनचोरी, घरफोडी करणारा सराईत गजाआड; पोलिसांची कामगिरी

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील वाहनचोरीच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी दक्षिण महाळुंगे एमआयडीसी पोलिस स्टेशनच्या तपास पथकाने धडक कारवाई करत एका सराईत चोरट्याला अटक केली आहे. त्याच्याकडून वाहनचोरी, घरफोडीच्या गुन्ह्यातील १ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. परिमंडल ४ च्या पोलीस उप आयुक्त श्वेता खेडकर यांनी दिलेल्या माहितीनुसार वाहनचोरीच्या घटनांचा तपास करताना पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे आरोपीपर्यंत पोहोचण्यात यश मिळवले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव प्रकाश तेज विश्वकर्मा (वय २०) असे असून तो मोरेवस्ती, चिखली परिसरात राहणारा आहे. त्याच्याकडून विविध ठिकाणांहून चोरी केलेल्या चार मोटारसायकली आणि एक दुचाकीचे स्पेअर पार्ट्स जप्त करण्यात आले आहेत. पोलिसांच्या चौकशीत आरोपीने शहरातील विविध भागांतून वाहनचोरी केल्याची कबुली दिली आहे. या कारवाईमुळे वाहनचोरीच्या अनेक गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. ही कारवाई पोलिस उपायुक्त शेता खेडकर यांच्या नेतृत्वाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ, पोलीस निरीक्षक गुन्हे अनिल देवडे, सहायक पोलिस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोलीस अंमलदार देवराम पारधी, विश्वास नाणेकर, किशोर सांगळे, युवराज बिराजदार, चेतन सावंत, राजेंद्र खेडकर, राजेश गिरी, महेश गायकवाड, राजकुमार हणमंते, प्रशांत कसबे, शिवाजी मरकड, आकाश घाडगे यांनी केली आहे.

### कॉंक्रिटीकरण कामाची माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्याकडून पाहणी

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपळे सौदागर येथील कुणाल आयकॉन रोडच्या कॉंक्रिटीकरणाच्या कामाची आज प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान कुणाल आयकॉन, शुभश्री, साई अवेन्यू अशा वेगवेगळ्या सोसायटीच्या गेट समोर पावसाळ्या दरम्यान पाणी साठते त्या ठिकाणी चेंबर बनवून त्याचे कनेक्शन स्ट्रॉम वॉटरला जोडण्याचे व त्या पाण्याचा सुरळीत रित्या निचरा करण्याच्या सूचना दिल्या सुरू असलेल्या कामाचा दर्जा, गती आणि नियोजनाचा सखोल आढावा घेण्यात आला. यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाचे डेप्युटी इंजिनिअर चंद्रकांत मोरे, विद्युत विभागाच्या डेप्युटी इंजिनिअर दिपाली रेडे, विद्युत विभागाचे सल्लागार, स्थापत्य विभागाचे ज्युनिअर इंजिनिअर विवेक गजपुरे, पाणीपुरवठा विभागाचे ज्युनिअर इंजिनिअर अंकुश सयाजीराव, तसेच इन्फ्राकिंग कन्सल्टन्सी इंजिनियर्स प्रा. लि. चे प्रकल्प सल्लागार आर. ई. राकेश पटेल आणि T@T इन्फ्रा लिमिटेडचे प्रोजेक्ट मॅनेजर युवराज आवारे आदी मान्यवर उपस्थित होते. सदर रस्त्याचे काम पावसाळ्यापूर्वी उच्च दर्जात व वेळेत पूर्ण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे अधोरेखित करत, कामाची गती वाढविण्याच्या स्पष्ट सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. तसेच कामाच्या दरम्यान नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. या पाहणीदरम्यान स्थानिक सोसायट्यांचे चेअरमन, सभासद व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांनी मांडलेल्या सूचना व समस्या समजून घेत त्यावर तात्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले. कुणाल आयकॉन रोडचे कॉंक्रिटीकरण पूर्ण झाल्यानंतर परिसरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत होणार असून, नागरिकांना दर्जेदार व सुरक्षित रस्ता उपलब्ध होणार आहे. स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारे हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

### लोणावळ्यात कुणेनामा येथे हायप्रोफाईल जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

लोणावळा (दैनिक संध्या) : लोणावळा शहरातील कुणेनामा परिसरातील एका बंगल्यात सुरू असलेल्या मोठ्या जुगार अड्ड्यावर लोणावळा शहर पोलिसांनी मध्यरात्री धाड टाकली. या कारवाईत रोख रक्कम, महागडे मोबाईल आणि अलिशान गाड्यांसह एकूण ४९ लाख ६४ हजार ७९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी बंगल्याचा मालक आणि जुगार खेळणाऱ्यांसह एकूण २२ जणांवर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ मार्च २०२६ रोजी पहाटे ४:४० वाजण्याच्या सुमारास कुणेनामा (ता. मावळ) येथील एका बंगल्यात ही धडक कारवाई करण्यात आली. करण पाटील या इसमाने हा बंगला मालक हनुमंत एकनाथ थोरबोले (रा. आर के. हॉटेल शेजारी, वरसोली टोलनाका, ता. मावळ) याच्याकडून ६० हजार रुपये भाड्याने घेतला होता व तेथे हा बेकायदेशीर जुगाराचा अड्डा चालवला जात होता.

# राजमाता जिजाऊ उड्डाणपूल ते गंगोत्री पार्क रस्ते कामाचा आढावा

**पिंपरी (दै. संध्या) :**

भोसरीतील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल ते गंगोत्री पार्क या मार्गावरील रस्त्याचा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित आहे. त्यामुळे हे काम गुणवत्तापूर्ण, वेळेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. कामाच्या कालावधीत वाहतुकीस कमीत कमी अडथळा निर्माण होईल यासाठी पोलीस व महापालिका प्रशासनाने समन्वयाने काम करावे, अतिक्रमणावर तात्काळ कारवाई करावी, तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत सर्व विभागांनी जबाबदारीने आपली कामे पार पाडावीत, असे निर्देश महापौर रवि लांडगे यांनी दिले.




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी आज भोसरी येथील प्रभाग क्र. ५ मधील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल ते गंगोत्री पार्क या दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाची पाहणी केली. या पाहणीदरम्यान त्यांनी संबंधित विभागांना विविध महत्त्वपूर्ण सूचना देत कामाचा सविस्तर आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. या पाहणी दरम्यान त्यांचे समवेत नगरसदस्या भिमाबाई फुगे, प्रा. सोनाली गव्हाणे तसेच नगरसदस्य सागर गवळी, जालिंदर शिंदे, विराज लांडे आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी तानाजी नरळे, पोलीस निरीक्षक वर्षाराणी पाटील तसेच पाणीपुरवठा, स्थापत्य, शहरी दळणवळण, ड्रेनेज, जलनिस्सारण, नगररचना आदी विभागांचे कार्यकारी अभियंते, उपअभियंते आणि आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पाहणीदरम्यान महापौर यांनी पोलीस प्रशासनास रहदारी कमी करून वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पर्यायी मार्गांची प्रभावी अंमलबजावणी करावी, तसेच नागरिकांना योग्य मार्गदर्शन करण्यात यावे, असेही त्यांनी सांगितले. महापालिकेच्या स्थापत्य विभागास रस्त्याचे काम विहित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देताना कामाच्या गुणवत्तेशी कोणतीही तडजोड होऊ नये, यावर त्यांनी विशेष भर दिला. शहरी दळणवळण विभागास वाहतूक व्यवस्थापन अधिक कार्यक्षम करण्यासाठी आवश्यक नियोजन करावे, असे निर्देश देण्यात आले. तसेच पाणीपुरवठा, ड्रेनेज व जलनिस्सारण विभागांना रस्त्याच्या कामासोबतच संबंधित पायाभूत सुविधा सुरळीत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. भविष्यात रस्ता पुन्हा उकरावा लागू नये यासाठी सर्व कामे समन्वयाने पूर्ण करावीत, असे त्यांनी स्पष्ट केले. नगररचना विभागास नियोजनबद्ध विकासावर लक्ष केंद्रित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आरोग्य विभागास कामाच्या परिसरात स्वच्छता राखणे, कचरा व्यवस्थापन सुरळीत ठेवणे तसेच नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. याशिवाय रस्त्यालगत असलेल्या अतिक्रमणांवर तातडीने कारवाई करून रस्ता मोकळा ठेवावा, जेणेकरून वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही, असेही महापौरांनी स्पष्ट केले. पाहणीदरम्यान महापौरांनी प्रभागातील नगरसदस्य व नगरसदस्या यांच्याशीही संवाद साधत स्थानिक समस्या व नागरिकांच्या अपेक्षा जाणून घेतल्या आणि त्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

> भोसरी परिसरातील प्रभाग क्र. ५ मधील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल ते गंगोत्री पार्क या दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या कामामुळे वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत होता. याबाबत स्थानिक नागरिक तसेच नगरसदस्यांकडून हा रस्ता तात्पुरता बंद ठेवावा आणि पर्यायी स्वरूपात एकेरी वाहतूक सुरू ठेवावी, अशी सातत्याने मागणी करण्यात येत होती. या मागणीची दखल घेऊन आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत श्रीराम नवमीपर्यंत सदर रस्ता पूर्णतः बंद ठेवण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. श्रीराम नवमीनंतर कामाच्या प्रगतीनुसार हा रस्ता एकेरी वाहतुकीसाठी टप्प्याटप्प्याने खुला करण्यात येईल, जेणेकरून नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळेल आणि कामही सुरळीत पार पडेल. रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर हा मार्ग पुन्हा दुहेरी वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल. ही उपाययोजना तात्पुरती असली तरी ती नागरिकांच्या सोयी, सुरक्षितता आणि वाहतुकीच्या शिस्तीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी पोलीस आणि महापालिका प्रशासनाला सहकार्य करून पर्यायी मार्गांचा वापर करावा.
> **– रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## खतांच्या दरवाढीने बळीराजा संकटात; शेतीचे आर्थिक गणित बिघडले

**पिंपरी (दै. संध्या) :**

जागतिक स्तरावर सुरू असलेल्या युद्धपरिस्थितीचा थेट परिणाम आता शेतीक्षेत्रावर जाणवू लागला आहे. खतांच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या कच्च्या मालाच्या पुरवठ्यात अडथळे आणि गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याने देशांतर्गत बाजारात खतांच्या किंमतीत दहा ते पंधरा टक्के वाढ झाली आहे. यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या बळीराजावर आणखी ताण वाढला आहे. विशेषतः युरोप आणि आशियातील काही देशांमध्ये सुरू असलेल्या संघर्षामुळे नैसर्गिक वायू, फॉस्फेट आणि पोटॅश यांसारख्या घटकांच्या निर्यातीवर मर्यादा आल्या आहेत. खतनिर्मितीसाठी हे घटक अत्यावश्यक असल्याने उत्पादन खर्च वाढला आहे. परिणामी, युरिया, डीएपी आणि एनपीके खतांच्या दरात लक्षणीय वाढ झाली आहे. महाराष्ट्रासह देशातील विविध भागांमध्ये शेतकऱ्यांना खतांच्या वाढत्या दरांचा फटका बसत आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर खतांची गरज असते. मात्र, वाढलेल्या किमतीमुळे अनेक शेतकरी खतांची खरेदी कमी करत आहेत किंवा पर्यायी उपाय शोधत आहेत. याचा थेट परिणाम उत्पादनावर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

यंदाचा खरीप हंगाम जवळ येत असल्यामुळे शेतकऱ्यांनी आतापासूनच शेतीची मशागत आणि खत-बियाण्यांची जुळवाजुळव करायला सुरुवात केली आहे. मात्र, बाजारात खते खरेदी करण्यासाठी गेल्यावर वाढलेले भाव बघून शेतकऱ्यांच्या पायाखालची जमीनच सरकली आहे. रासायनिक खतांच्या किमतींमध्ये थेट 15 टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. याचा फटका शेतकऱ्यांना बसू लागला आहे. कोणत्याही पिकाच्या दर्जेदार आणि भरघोस उत्पादनासाठी रासायनिक खते हा एक अत्यंत आवश्यक घटक मानला जातो.

## प्लास्टिक वापरणाऱ्या विक्रेत्यांना महापालिकेचा दणका

**पिंपरी (दै. संध्या) :**

■ भरारी पथकाची दंडात्मक धडक कारवाई सुरू

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ‘क’ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत आरोग्य विभागाकडून प्लास्टिक वापर आणि अस्वच्छतेविरोधात धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत नागरिक व व्यावसायिकांकडून एकूण ३१ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून प्लास्टिक साहित्यही जप्त करण्यात आले आहे.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सहा. आयुक्त किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य आरोग्य निरीक्षक वैभव घोळवे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

या मोहिमेत प्रभाग क्रमांक ०८, इंद्रायणी नगर येथे प्लास्टिक



वापरणाऱ्या व्यावसायिकांवर कारवाई करत १० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच ५ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. याच ठिकाणी आरोग्य विघातक कृत्ये, कचरा टाकणे व प्लास्टिक वापर करणाऱ्यांवर कारवाई करत आणखी ८ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

तसेच प्रभाग क्रमांक ०९, नेहरू नगर येथे करण्यात आलेल्या कारवाईत १३ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून ३ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. या संपूर्ण कारवाईचे नेतृत्व मुख्य आरोग्य निरीक्षक वैभव घोळवे, आरोग्य सहाय्यक गीता रिल व जगदीश चिंचोलीकर तसेच, अन्य महापालिका अधिकारी व कर्मचारी यांनी केले.

महापालिकेच्या या कारवाईमुळे प्लास्टिक वापरावर आळा बसण्यास मदत होत असून शहर स्वच्छ व वसुंधरापूरक ठेवण्यासाठी नागरिकांनी नियमांचे पालन करावे, असे मत क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे यांनी यावेळी व्यक्त केले.

> शहरात प्लास्टिक वापर आणि अस्वच्छतेविरोधात महापालिका सातत्याने कठोर कारवाई करत आहे. पर्यावरण संरक्षण आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्लास्टिकमुक्त शहराची संकल्पना राबविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. नागरिकांनी कचरा व्यवस्थापन नियमांचे काटेकोर पालन करून, ओला व सुका कचरा वेगळा करणे, तसेच प्लास्टिकचा वापर टाळणे गरजेचे आहे. सर्वांनी मिळून स्वच्छ, निरोगी आणि शाश्वत शहर घडविण्यासाठी सहकार्य करावे.
> **– डॉ. प्रदीप ठेंगल**
> **उप आयुक्त, आरोग्य विभाग**
> **पिंपरी चिंचवड महानगरपालिका**


> प्लास्टिक बंदीचे नियम मोडणाऱ्यांवर यापुढेही अशाच प्रकारे कडक कारवाई करण्यात येईल. शहरातील पर्यावरणाचे रक्षण आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही कारवाई अत्यंत आवश्यक आहे. व्यावसायिकांनी वसुंधरापूरक पर्यायांचा अवलंब करून महापालिकेला सहकार्य करावे. नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाईसोबतच पुढील कठोर पावले उचलली जातील.
> **– किरणकुमार मोरे, सहाय्यक आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाजवळ ट्रान्सफॉर्मरचा भीषण स्फोट

**अग्निशामक दलाच्या तत्परतेने मोठा अनर्थ टळला**

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय परिसरात शनिवारी सायंकाळी ट्रान्सफॉर्मरचा भीषण स्फोट होऊन आग लागल्याची घटना घडली. सायंकाळी सुमारे ७.३० वाजण्याच्या सुमारास झालेल्या या स्फोटामुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. मात्र, अग्निशामक दलाने वेळेत घटनास्थळी पोहोचून आगीवर नियंत्रण मिळवल्याने मोठा अनर्थ टळला. मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस आयुक्तालयाजवळील एका इमारतीबाहेरील ट्रान्सफॉर्मरमध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाला. या बिघाडामुळे जोरदार स्फोट होऊन ट्रान्सफॉर्मरने पेट घेतला. स्फोटाचा आवाज मोठा असल्याने परिसरातील नागरिक घाबरून घराबाहेर आले. आगीच्या ज्वाळा शेजारील इमारतीच्या पार्किंगपर्यंत पोहोचल्याने तेथील वाहनांना धोका निर्माण झाला होता. घटनेची माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड अग्निशामक दलाच्या तीन गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी तत्परतेने पाण्याचा मारा करत आगीवर नियंत्रण मिळवले. त्यांच्या जलद कारवाईमुळे आग इमारतीच्या वरच्या मजल्यांपर्यंत पसरण्यापासून रोखली गेली. घटनेनंतर खबरदारीचा उपाय म्हणून महावितरणकडून परिसरातील वीजपुरवठा तात्पुरता




खंडित करण्यात आला.

या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी ट्रान्सफॉर्मरचे मोठे नुकसान झाले आहे. घटना वर्दळीच्या ठिकाणी घडल्याने काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, रात्री उशिरापर्यंत वीजपुरवठा सुरळीत करण्याचे काम सुरू होते.

## पालिकेत नोकरी, पण नियुक्तीपत्र बोगस!

**पिंपरी (दै. संध्या) :**

महापालिकेत नोकरी मिळावी म्हणून अनेकांचे स्वप्न असते. चांगल्या नोकरीतून जीवनातील अनेक गोष्टी साध्य होतील, या भावनेतून अनेकजण पालिकेत नोकरीसाठी प्रयत्न करत असतात. असे सावज हेरून त्यांचा गैरफायदा घेत शहरातील काही टोळ्या तसेच, एजंट मंडळी बेरोजगार तरुण व त्यांच्या पालकांना गंडा घालत महापालिकेत नोकरी लागल्याचे बोगस नियुक्तीपत्र विकत आहेत. त्या प्रकारात महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी तसेच, त्यांच्या नातेवाईकांचा समावेश असल्याचे समोर आले आहे. ही

■ महापालिकेच्या बनावट नियुक्तीपत्रांचे रॅकेट उघड; प्रशासनाच्या चुप्पीमुळे संशय अधिक गडद

बाब गंभीर असतानाही त्याबाबत महापालिका प्रशासनाची चुप्पी अनेक प्रश्न व शंका उपस्थित करत आहे. महापालिकेत अग्निशमन विभागाचे फायरमन तसेच, आरोग्य, उद्यान, स्थापत्य, वैद्यकीय विभाग तसेच, लिपिक पदाची भरती गेल्या दोन ते तीन वर्षांत झाली. आवश्यकतेनुसार महापालिकेकडून कर्मचाऱ्यांची भरतीप्रक्रिया राबविण्यात येते. त्याचा गैरफायदा घेऊन बोगस नियुक्तीपत्र विक्रीचे प्रकार शहरात घडत आहेत.

## पिंपरी-चिंचवडच्या ‘सखी आंगण’ उपक्रमाचे मुख्यमंत्र्यांकडून विशेष कौतुक

**आमदार अमित गोरखे यांनी आयुक्तांची भेट घेऊन सोपवले शुभेच्छा पत्र**

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत आकुर्डी रेल्वे स्थानक परिसरात राबविण्यात आलेल्या ‘सखी आंगण’ या महिला सक्षमीकरणाच्या अनोख्या उपक्रमाची दखल राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी घेतली आहे. या उपक्रमाबद्दल मुख्यमंत्र्यांनी महापालिका प्रशासन आणि सहभागी महिला बचत गटांचे विशेष कौतुक करत आमदार अमित गोरखे यांना शुभेच्छा पत्र पाठवले आहे. हे सन्माननीय पत्र आमदार गोरखे यांनी आज नवनियुक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांच्याकडे सुपूर्द केले.

यावेळी आमदार अमित गोरखे यांनी डॉ. विजय सूर्यवंशी यांचे आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारल्याबद्दल अभिनंदन केले. या भेटीदरम्यान शहरातील नवीन विकासकामे, पायाभूत सुविधा, वाहतूक शिस्त आणि कायदा व सुव्यवस्था यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली.

**महिला सक्षमीकरणाचा ‘आकुर्डी पॅटर्न’**

आकुर्डी रेल्वे स्थानक परिसरात ई-लिलाव प्रक्रियेद्वारे ४९ गाळ्यांचे वाटप महिला बचत गटांना करण्यात आले आहे. या केंद्रात खाद्यपदार्थ, हस्तकला आणि घरगुती वस्तूंच्या विक्रीसाठी सुसज्ज व सुरक्षित व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

या उपक्रमावर भाष्य करताना आमदार अमित गोरखे यांनी सांगितले की, ई-लिलाव प्रक्रियेच्या माध्यमातून ४९ गाळ्यांचे महिला बचत गटांना वाटप करून त्यांना सुसज्ज, सुरक्षित व सन्मानजनक व्यावसायिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. या केंद्राच्या माध्यमातून महिलांना खाद्यपदार्थ, हस्तकला आणि घरगुती वस्तूंच्या व्यवसायाची थेट संधी मिळाल्याने त्यांचे आर्थिक सक्षमीकरण होण्यास मोठी मदत होणार आहे. विशेष म्हणजे, या




केंद्राचे सुशोभीकरण आणि प्रसिद्धी करताना डिझायनिंग व मार्केटिंग क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी दिलेले योगदान अत्यंत कौतुकास्पद आहे. तसेच, ‘सखी आंगण’मधील भिंतींवर साकारण्यात आलेले महाराष्ट्रातील थोर महिलांचे कार्य आणि विदर्भातील पारंपरिक ‘गोंडी चित्रकले’चे दर्शन यामुळे हा प्रकल्प व्यावसायिकतेसोबतच सांस्कृतिकदृष्ट्याही समृद्ध झाला आहे. ‘सखी आंगण’ हा उपक्रम राज्यातील इतर महानगरपालिकांसाठी एक आदर्श आणि प्रेरणादायी ठरेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

> मुख्यमंत्री महोदयांनी ‘सखी आंगण’ उपक्रमाचे कौतुक करणे, ही संपूर्ण शहरासाठी अभिमानाची बाब आहे. हा प्रकल्प केवळ व्यावसायिक नसून महिलांच्या कौशल्य विकासाचे आणि आत्मविश्वासाचे केंद्र बनला आहे. डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अनुभवी नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवड महानगरपालिका विकासाच्या प्रगतीपथावर असेल, असा आम्हाला विश्वास आहे.
> **– अमित गोरखे, आमदार**

## थोडक्यात पण महत्वाचे...




## कै. बापु निवृत्ती भिसे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त किर्तन सेवा

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : 'माझ्या वडिलांची मिराशी गा देवा ! तुझी चरण सेवा पांडुरंगा !! संत तुकाराम महाराज' या युक्ती प्रमाणे नि:स्वार्थी प्रेम करणारा बाप आपल्या कुटुंबासाठी, विशेषतः मुला-मुलींच्या आनंदासाठी स्वतःचे आयुष्य पणाला लावतो. बाप हा त्यागाची मूर्ती आसतो मुलांच्या उज्वल भविष्यासाठी स्वतःच्या इच्छा मारून जगणारा बाप हा खरा आधारस्तंभ असतो. कठोर पण हळवा बापाचा वरकरणी कठोर स्वभाव हा मुलांना शिस्त लावण्यासाठी असतो, पण त्याच्या हृदयात प्रेमाचा महासागर असतो असे मत अखिल भारतीय वारकरी मंडळाचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष हभप आनंद महाराज तांबे यांनी व्यक्त केले. भावनिक साद देत कीर्तनातून वडिलांच्या प्रेमाचे प्रसंग वर्णन करताच उपस्थित श्रोत्यांचे मने जिंकली हिंगणगाव (ता.हवेली) येथील कै.बापु निवृत्ती भिसे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त किर्तन सेवा हभप आनंद महाराज तांबे यांनी केली. यावेळी चिंतामणी यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक कुंडलिक थोरात, पखवाज वादक ओम महाराज दोडके, दरबारीं गायक गजानन सोमटकर, वारकरी दादा जाधव राहू, गोरख थोरात, प्रा सुरेश वाळेकर, मधुकर थोरात, किसन थोरात, काळुराम थोरात आदी कुटुंबातील विठ्ठल भिसे, सुगंधा खरात, रतन थोरात, नंदा आवकीरकर, दिपक भिसे, रोहित भिसे, वंदना मारकड, आकाश भिसे, सुनिल थोरात, मोहन गायकवाड, अक्षय चौधरी, भिसे परिवारातील स्नेही, आप्तेष्ट, नातेवाईक, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मांडवगण फराटा येथे गोळीबार; एक जखमी, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

कवठे येमाई(दैनिक संध्या) : शिरूर तालुक्यातील मांडवगण फराटा येथे भैरवनाथ स्टेडियम परिसरात भांडण मिटवण्याच्या बहाण्याने बोलावून गोळीबार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत अक्षय गोविंदा पाटील (वय 29, रा. तळेगाव ढमढेरे) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत.याप्रकरणी शिरूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर करण्यात आला असून अमोल आनंदा चौगुले (वय 30), संदीप उर्फ भैय्या तेलंग (वय 27) व संदीप सुदाम गिरे (वय 35, सर्व रा. मांडवगण फराटा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरूर पोलिसांकडून मिळालेल्या माहिती नुसार 19 मार्च 26 रोजी दुपारी सुमारे 2.30 वाजता अमोल चौगुले यांनी फिर्यादी अक्षय पाटील यांना फोन करून भांडण मिटवण्यासाठी मांडवगण फराटा येथे बोलावले. त्यानुसार पाटील हे त्यांच्या मित्रांसह कारने तेथे पोहोचले.तेथे पोहोचल्यानंतर अमोल चौगुले यांनी पाटील यांची कॉलर पकडून वाद घातला. यावेळी संदीप गिरे यांनी जवळील पिस्टल काढून पाटील यांच्या दिशेने गोळीबार केला. त्यानंतर पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना अमोल चौगुले यांनी पिस्टल घेऊन पुन्हा गोळीबार केला. या गोळीबारात पाटील यांच्या उजव्या बरगडीवर गोळी लागून ते जखमी झाले.जखमी पाटील यांना प्रथम वाघोली येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले, त्यानंतर पुढील उपचारासाठी पुणे येथील ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा जबाब नोंदवून गुन्हा दाखल करण्यात आला.या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक चव्हाण करत असून, गुन्हा दाखल अंमलदार म्हणून पीएसआय खतिंग यांनी कार्यवाही केली आहे. शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात एकाच खळबळ उडाली आहे.

## आखाती युद्धामुळे कांदा निर्यात व्यवहार ठप्प

चाकण (दैनिक संध्या) : आंतरराष्ट्रीय घडामोडी आणि स्थानिक पातळीवरील वाढलेली आवक यामुळे खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कांद्याच्या दरात मोठी घसरण झाली आहे. सध्या कांद्याला केवळ १३ ते १४ रुपये प्रति किलो दर मिळत असून, शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. गतवर्षी मार्च महिन्याच्या मध्यंतरी कांद्याला सुमारे २० रुपये प्रति किलो दर मिळत होता. मात्र, यंदा परिस्थिती पूर्णतः वेगळी आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर इराण आणि इस्राईल, अमेरिका यांच्यातील युद्धामुळे भारतीय निर्यात व्यवहारावर परिणाम झाला आहे. परिणामी कांद्याची निर्यात मंदावली असून, बाजार भाव गडगडले आहेत. कांद्याचे उत्पादन यंदा चांगले झाल्याने बाजारात मोठ्या प्रमाणात कांदा आवक झाली आहे. मागणी कमी असल्याने दर घसरले आहेत. या परिस्थितीत शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही वसूल करणे कठीण झाले आहे.

“दिवसेंदिवस कांद्याला अत्यंत कमी दर मिळत आहे. निर्यात बंद असल्याने बाजारावर मोठा ताण आला आहे. आवक जास्त आणि मागणी कमी असल्यामुळे शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागत आहे. उत्पादन खर्च निघत नसल्यामुळे पुढील आर्थिक गणिते कोलमडली आहेत.”

**- संभाजी कलवडे, व्यापारी, चाकण.**

“शासनाने तातडीने हस्तक्षेप करून कांद्याला योग्य दर मिळवून देण्यासाठी उपाययोजना कराव्यात. निर्यात सुलभ करावी आणि बाजार स्थिर ठेवावा. कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाले असून, लवकर निर्णय न झाल्यास आर्थिक संकट अधिक गडद होऊ शकते.

**- चंद्रकांत गोरे, व्यापारी, चाकण.**

## पुरंदरचे कृषी अधिकारी यांच्याकडून नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी



पुरंदर (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यात अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी सुरू असून पुरंदर तालुका कृषी अधिकारी श्रीधर चव्हाण यांनी पिसर्वे, मावडी व नायगाव आदी गावांना नुकतीच भेट दिली. या दौऱ्यात त्यांनी शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन प्रत्यक्ष नुकसानीची पाहणी केली. गारपिटीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. संबंधित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच शासनाच्या मदतीसाठी आवश्यक ती माहिती संकलित केली.यावेळी त्यांनी पंचनामे तात्काळ करण्याच्या सूचना संबंधित कर्मचाऱ्यांना दिल्या. तसेच बाधित शेतकऱ्यांना शासनाच्या योजनांद्वारे मदत मिळवून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. स्थानिक शेतकऱ्यांनीही प्रशासनाने लवकरात लवकर मदत जाहीर करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.यावेळी कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच शेतकरी उपस्थित होते.

# भटक्या कुत्र्यांना पकडण्यासाठी जलद कृती दल अलर्ट

**चाकण (दै. संध्या)**





चाकण येथील आंबेठाण चौकातील उड्डाण पुलाजवळ भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात गेल्या आठवड्यात नांदेड जिल्ह्यातील एका बत्तीस वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची अत्यंत गंभीर व दु:खद घटना घडली. त्यामुळे चाकण शहर व परिसरात भटक्या कुत्र्यांना पकडण्यासाठी जलद कृती दल अलर्ट झाले आहे. या घटनेची चाकण नगरपरिषदेने अत्यंत गांभीर्याने दखल घेत संबंधित परिसरात जलद कृतीदल तैनात करण्यात आले आहे.

चाकणला आंबेठाण चौक, उड्डाणपूल व मार्केट यार्ड परिसरातील हल्ला करणाऱ्या भटक्या कुत्र्यांना त्वरित पकडण्यात आले आहे. पकडण्यात आलेल्या कुत्र्यांना नगरपरिषदेने तयार केलेल्या निवारा केंद्रात ठेवण्यात आले आहे. त्यांच्यावर रेबीज प्रतिबंधक लसीकरण व निर्बीजीकरण करण्यात आले आहे. चाकण शहरातील भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने चाकण नगरपरिषदेच्या माध्यमातून सन २०२५ पासून कुत्रे निर्बीजीकरण व रेबीज प्रतिबंधक लसीकरण मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे.

जानेवारी २०२६ पासून आजपर्यंत ३०४ कुत्र्यांवर ही प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडण्यात आली आहे. सद्यस्थितीत एबीसी केंद्रामध्ये भटक्या कुत्र्यांवर निर्बीजीकरण व लसीकरणाची प्रक्रिया सुरू असून शहरातील विविध भागांमध्ये भटक्या कुत्र्यांना पकडण्याची मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. पिसाळलेल्या अथवा आक्रमक कुत्र्यांची तक्रार प्राप्त होताच जलद कृतीदल तात्काळ घटनास्थळी पोहोचून जाळीच्या साहाय्याने अशा कुत्र्यांना पकडून सुरक्षित निवारा केंद्रात हलविण्याची कार्यवाही करीत आहेत. दुर्दैवी घटना घडलेल्या येथील आंबेठाण चौकातील पुलाखालच्या परिसरात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य तथा शिवसेनेचे गटनेते नितीन गोरे यांच्या सूचनेनुसार तात्काळ उपाययोजना करण्यात येऊन पुलाखाली प्रकाश व्यवस्था, लाईट्स व सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. यामुळे सदर परिसरातील सुरक्षिततेत मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. तसेच नागरिकांच्या सोयी व सुरक्षेच्या दृष्टीने लवकरच पुलाच्या दोन्ही बाजूंनी सर्व्हिस रोडवरही स्ट्रीट लाईट बसविण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

चाकण नगरपरिषद नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत असून सदर मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. आगामी काळातही ही मोहीम अधिक गतीने व नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात येणार आहे. तसेच सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शहर स्वच्छ व सुंदर ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. सार्वजनिक ठिकाणी किंवा रस्त्याच्या कडेला उघड्यावर कचरा टाकू नये, यामुळे भटक्या कुत्र्यांची संख्या वाढण्यास आळा बसेल.

तसेच चाकण शहरात वाढती अस्वच्छता आणि भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर चाकण नगरपरिषदेने अत्यंत कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. वारंवार सूचना देऊनही उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर आता केवळ दंडच नाही, तर थेट फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

" नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी चाकण नगरपरिषद सदैव कटिबद्ध व तत्पर राहील. नागरिकांनी घाबरून जाऊ नये. उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर आता दंडच नव्हे तर थेट फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे."
**- नितीन गोरे, सदस्य, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,**

## गॅस सिलेंडर मिळण्यासाठी चाकणला महामार्गावर संतप्त नागरिकांचे आंदोलन



**चाकण (दै. संध्या)**

बुकिंग करूनही घरपोच गॅस सिलेंडर सेवा मिळत नाही. त्यामुळे एजन्सीकडे लाईनमध्ये उभे राहूनही गॅस टाक्या मिळत नसल्याने संतप्त झालेल्या नागरिकांनी चाकणला शनिवारी (दि.२१) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास थेट पुणे - नाशिक महामार्गावर ठिय्या आंदोलन करत वाहतूक रोखली. अचानक झालेल्या या आंदोलनामुळे काही काळ महामार्गावर मोठा वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण झाला. आखातात सुरू असलेल्या युद्धामुळे गेल्या काही दिवसांपासून गॅस पुरवठा अपुरा असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. ऑनलाइन बुकिंग करूनही गॅस सिलेंडर मिळत नसल्याने नागरिकांना तासनतास प्रतीक्षा करूनही सिलेंडर मिळत नसल्याने संतापाची भावना तीव्र झाली. अखेर नागरिकांनी एकत्र येत प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करत रास्ता रोको आंदोलन छेडले. घटनेची माहिती मिळताच चाकण वाहतूक पोलीस आणि दक्षिण चाकण पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी आंदोलकांशी चर्चा करून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. काही वेळाने वाहतूक पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले.

“गॅस मिळत नसल्याने घरगुती व्यवहार ठप्प झाले असून नागरिकांना रात्रंदिवस रांगेत उभे रहावे लागत असल्याने मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. गॅस सिलेंडरचा मोठ्या प्रमाणात काळा बाजार सुरू आहे. मुलांना शाळेत जाताना जेवणाचा डबा सुद्धा देत नाही." - **नवनाथभाऊ शेडगे, अध्यक्ष, शालेय शिक्षण समिती, वाघजाईनगर, चाकण**

## चोरट्यांचा तब्बल २८ तोळे सोन्यावर डल्ला

**निरगुडसर (दै. संध्या)**

माहेरी यात्रा असल्याने घराला कुलूप लावून घरातील बाहेर गेल्यानंतर ही संधी साधत अज्ञात चोरट्यांनी तब्बल २८ तोळे सोन्यावर डल्ला मारला असून ४० लाखाहून अधिक नुकसान झाले आहे. निरगुडसर (ता.आंबेगाव) येथील वळसेमळा येथील शीला सोनु वळसे यांच्या घरी चोरट्यांनी हात साफ करत तब्बल २८ तोळ्यांचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची धक्कादायक घटना शनिवार(ता.२१) रोजी रात्री उघडकीस आली आहे,या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. निरगुडसर येथील वळसेमळा येथे निरगुडसर-अवसरी बुद्रुक रस्त्यालगत शीला सोनु वळसे पाटील या आपल्या बंगल्यात एकट्याच वास्तव्यास आहेत.

## “कौशल्यंम” स्किल सेंटरमुळे रोजगाराच्या नव्या संधी

### ग्रामीण युवकांसाठी पुणे जिल्हा परिषदेची मोठी घोषणा

**नाझरे सुपे (दै. संध्या)**

पुणे जिल्हा परिषदेच्या 2026-27 च्या अर्थसंकल्पात युवकांच्या भविष्याला दिशा देणारा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. “कौशल्यंम” या स्किल सेंटर योजनेद्वारे ग्रामीण भागातील युवकांना आधुनिक व रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्याचा निर्धार प्रशासनाने व्यक्त केला आहे.

या योजनेअंतर्गत जिल्ह्यात स्किल सेंटरची उभारणी करून विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान स्किल्स, तांत्रिक शिक्षण, सॉफ्ट स्किल्स तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जाणार आहेत. बदलत्या औद्योगिक गरजांचा विचार करून अभ्यासक्रम तयार केले जाणार असून, युवकांना थेट नोकरीसाठी सक्षम बनविण्यावर भर दिला जाणार आहे प्रशिक्षण प्रक्रियेत अनुभवी प्रशिक्षकांचा सहभाग असणार असून अत्याधुनिक मशिनरी व टूल्सचा वापर केला जाणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राची प्रत्यक्ष ओळख करून देण्यासाठी इंडस्ट्री व्हिजिटचे आयोजन केले जाईल.

याशिवाय, विविध क्षेत्रातील तज्ज्ञांच्या गेस्ट लेक्चर्सद्वारे मार्गदर्शन केले जाणार आहे. स्थानिक उद्योगांशी टाय-अप करून प्रशिक्षणानंतर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात आला आहे.

“कौशल्य विकासावर भर देत ग्रामीण युवकांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरेल.”

“कौशल्यंम (कौशल्य केंद्र)” योजना
योजना क्रमांक: ०३ – स्किल सेंटर (कौशल्य केंद्र)

# टाकळी हाजी ग्रामपंचायतीकडून महावितरणला निवेदन

### सायंकाळी होणारे लोडशेडिंग रद्द करण्याची मागणी

**कवठे येमाई (दै. संध्या)**



शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी ग्रामपंचायतीने महावितरण कडून सायंकाळच्या वेळेत होत असलेल्या वीज कपाती विरोधात महत्त्वपूर्ण पाऊल उचलत महावितरणला निवेदन दिले आहे. ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच अरुणाताई दामुअण्णा घोडे यांनी दि. २२ रोजी शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथील श्री विठ्ठल मंदिरात आयोजित महवितरण अधिकारी पदाधिकारी,शेतकरी,ग्रामस्थ यांच्यात झालेल्या समन्वय बैठक व वीज समस्या व निवारण संदर्भात आयोजित सभेत केडगाव विभागातील कार्यकारी अभियंता विकास आल्हाट यांना निवेदन सादर केले. यावेळी शिरूरचे माजी आमदार पोपटराव गावडे,भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीपदादा वळसे पाटील,जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे,प्रकाश पवार महावितरण चे शिरूर सहायक अभियंता गोरे,टाकळी हाजी शाखा अभियंता नितीन मुरकुटे,या भागातील बहुसंख्य वायरमन,शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.ग्रामपंचायत ने दिलेल्या निवेदनात सायंकाळी ६ ते १० वाजेदरम्यान करण्यात येणारे लोडशेडिंग तात्काळ रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.

ग्रामपंचायतीने दिलेल्या माहितीनुसार, दिनांक १८ मार्च २०२६ पासून टाकळी हाजी येथे नवीन वीज पुरवठा वेळापत्रक लागू करण्यात आले आहे. या वेळापत्रकानुसार सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत वीज पुरवठा खंडित केला जात आहे. मात्र, ही वेळ सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची असल्याने गावात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सध्या शाळा व महाविद्यालयांच्या परीक्षा सुरू असल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर या लोडशेडिंगचा थेट परिणाम होत आहे. सायंकाळची वेळ ही अभ्यासासाठी महत्त्वाची असताना वीज नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.तसेच, सायंकाळच्या वेळेत संपूर्ण गाव अंधारात बुडाल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत आहे. विशेषतः महिला व लहान मुलांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. घरगुती कामेही अडथळ्यात येत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शेतकऱ्यांच्या दृष्टीनेही ही परिस्थिती गंभीर ठरत असून, नवीन वेळापत्रकानुसार रात्री उशिरा वीज दिली जात असल्याने पिकांना पाणी देताना शेतकऱ्यांना वन्य प्राण्यांचा धोका वाढला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.या सर्व पार्श्वभूमीवर टाकळी हाजी ग्रामपंचायतीने महावितरण प्रशासनाला सायंकाळचे लोडशेडिंग तात्काळ रद्द करून दिवसा अधिक वेळ वीज पुरवठा करावा, तसेच वेळापत्रकात त्वरित सुधारणा करावी, अशी मागणी केली आहे. गावकऱ्यांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणाऱ्या या समस्येकडे महावितरण प्रशासन कितपत गांभीर्याने पाहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## राजगुरुनगरमध्ये रमजान ईद शांतता पूर्ण वातावरणात साजरी

**राजगुरुनगर (दै. संध्या)**

राजगुरुनगर येथे रमजान ईद (ईद-उल-फित्र) मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. येथील प्रसिद्ध ऐतिहासिक दिलावर खान दर्गा मैदानावर आज सकाळी ८.३० वाजता राजगुरुनगर व परिसरातील हजारो मुस्लिम बांधव एकत्र येऊन ईदची नमाज अदा केली. नमाजानंतर सर्वांनी एकमेकांना आलिंगन देत ईदच्या शुभेच्छा दिल्या.

मुस्लिम समाजात रमजान महिन्याला विशेष महत्त्व असून या महिन्याला इतर महिन्यांचा ‘सरदार’ असे संबोधले जाते. या पवित्र महिन्यात प्रत्येक मुस्लिम बांधवाच्या घरी धार्मिक वातावरण असते. तीस दिवस सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत रोजा (उपवास) पाळला जातो आणि विशेष नमाज अदा केली जाते. उर्दू शव्वाल महिन्याच्या पहिल्या दिवशी ईद साजरी केली जाते. चंद्रदर्शन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी मुस्लिम बांधव ईदची नमाज अदा करण्यासाठी दर्गा मैदानावर एकत्र येतात.

यावेळी मशिदीचे प्रमुख मौलाना मुस्तकिम यांनी उपस्थितांना रमजानचे महत्त्व सांगत नमाज अदा केली. शहरातील विविध मशिदींचे मौलाना व मान्यवरही उपस्थित होते. मौलाना यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, ईदचा आनंद साजरा करताना परमेश्वराला विसरू नका, अल्लाहसमोर नतमस्तक व्हा आणि रमजानचे रोजे करण्याची संधी दिल्याबद्दल आभार माना. तसेच नमाजपूर्वी जकात (दान) करणे ही महत्त्वाची आर्थिक उपासना असल्याचे त्यांनी सांगितले.

# चाकण बाजारात हिरवी मिरची, टोमॅटो व लसणाचे भाव गडगडले



**चाकण (दै. संध्या)**

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये हिरवी मिरची, टोमॅटो व लसणाचे भाव गडगडले आहेत. कांद्याची किरकोळ आवक झाल्याने भाव स्थिरावले. जळगाव भुईमूग शेंगा व बंदूक भूईमूग शेंगा यांची काहीच आवक झाली नाही. चाकण बाजारात पालेभाज्यांची किरकोळ आवक झाल्याने भाव कडाडले. राजगुरुनगर येथील बाजारात दोडका, काकडी, वांगी, भेंडी, शेवगा व वाटाण्याची प्रचंड आवक झाली. एकूण उलाढाल ४ कोटी ७० लाख रुपये झाली. चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ८ हजार क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ४ हजार क्विंटलने घटल्याने भाव स्थिर राहिले. कांद्याचा कमाल १,४०० रुपयांवर स्थिरावला. बटाट्याची एकूण आवक १,४०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक स्थिर राहूनही भावही १,२०० रुपयांवर स्थिरावले.लसणाची एकूण आवक ५० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक स्थिर राहूनही कमाल भावही १२ हजार रुपयांवर स्थिरावले.

हिरव्या मिरचीची एकूण आवक ३१० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ५ हजार रुपयांपासून ७ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे - कांदा - एकूण आवक - ८,००० क्विंटल. भाव क्रमांक - १.१,४०० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव क्रमांक ३. ८००. बटाटा - एकूण आवक - १,४०० क्विंटल. भाव क्रमांक १.१,२०० रुपये, भाव क्रमांक २.१,००० रुपये, भाव क्रमांक ३.८०० रुपये.

फळभाज्या - फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

टोमॅटो - ३०८ क्विंटल (१,००० ते १,५०० रू.), कोबी - २३५ क्विंटल (५०० ते ७०० रू.), फ्लॉवर - २१५ क्विंटल (६०० ते १,२०० रु.), वांगी - ९५ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), भेंडी - १०२ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), दोडका - ६२ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), कारली - ७२ क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), दुधीभोपळा - ६३ क्विंटल (१,००० ते १,५०० रु.), काकडी - १२० ( क्विंटल (८०० ते १,२०० रु.), फरशी - ३३ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.), वालवड - ४४ क्विंटल (३,००० ते ५,००० रुपये), ढोबळी मिरची - १२२ क्विंटल (४,००० ते ५,००० रु.), चवळी - ३३ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), वाटाणा - ४५ क्विंटल ( ३,५०० ते ४,५०० रू. ), शेवगा - ३९ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), गाजर - ७५ क्विंटल (१,२०० ते १,६०० रु.), गवार - ५० क्विंटल (५,००० ते ७,००० रु. ), आले - १३० क्विंटल ( ३,००० ते ४,५०० रु. )

## पर्यावरण संतुलनासाठी सामाजिक वनीकरण काळाची गरज



**'जागतिक वन दिन' हा मानव आणि निसर्ग यांच्यातील दृढ नात्याची जाणीव करुन देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे. वाढत्या पर्यावरणीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर वृक्ष लागवड, संवर्धन आणि संगोपन ही गरजेबरोबरच सामूहिक जबाबदारी बनली आहे. पर्यावरणाचा समतोल आणि संतुलन राखण्यासाठी खासगी आणि सामूहिक जमिनींवर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करुन वनांचे प्रमाण वाढवणे, जैवविविधता वाढवणे, टिकवणे आणि संवर्धन करण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत..**

राष्ट्रीय वननीती 1988 नुसार एकूण भौगोलिक क्षेत्राच्या 33 टक्के भागावर वृक्षाच्छादन असणे आवश्यक आहे. यामुळेच पर्यावरणाचा समतोल व संतुलन राखणे तसेच संवर्धन करणे शक्य होते. महाराष्ट्रात 307 लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी 61.35 लाख हेक्टर जमीन वृक्षाच्छादित असून हे प्रमाण साधारण 20 टक्के आहे.

जागतिक तापमानवाढ, वातावरणीय बदल, अनियमित पर्जन्यमान, अतिवृष्टी, दुष्काळ, ढगफुटी, महापूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे पर्यावरणाच्या संतुलनात आणि जैवसृष्टीच्या स्थिरतेमध्ये सातत्याने बदल होत आहेत. पर्यावरणाचे असंतुलन, वाढते प्रदूषण आणि त्यातून होणाऱ्या बदलाचा थेट परिणाम मानवी जीवनावर होत आहे. या पार्श्वभूमीवर वन व वन्य जीवांचे संरक्षण, संवर्धन व संगोपनासाठी वन विभाग व वन्यजीव विभाग अत्यंत महत्वाची भूमिका बजावत आहे. सामाजिक वनीकरण विभागामार्फत खासगी आणि सामूहिक जमिनींवर वृक्ष लागवड करून वृक्षाच्छादन वाढविण्याचे काम सातत्याने केले जात आहे. राज्यात त्या त्या क्षेत्रातील मातीचा स्तर, हवामान आणि पर्जन्यमान यांचा विचार करुन स्थानिक, दुर्मिळ व औषधी वृक्षांची लागवड करण्यात येते. त्याचबरोबर व्यापारी उत्पादन वाढवण्याच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या वृक्ष लागवडीबाबत कौशल्य मिळवून देण्याचे काम सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने केले जाते. यामुळे जैव विविधता वाढविणे, टिकविणे आणि संवर्धन करणे शक्य होत आहे. कोल्हापूर सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिनस्त 10 परिक्षेत्र कार्यालयांमार्फत 2025 च्या पावसाळ्यात 49 हेक्टर वनेत्तर क्षेत्रावर 54 हजार 439 रोपांची लागवड करण्यात आली. या रोपांचे संगोपन व देखभाल प्रभावीपणे करण्यात येत असून जिवंत रोपांचे प्रमाण 90 टक्क्यांहून अधिक आहे, ही बाब उल्लेखनीय आहे.

कोल्हापूर सामाजिक वनीकरण विभागामार्फत 2026 च्या पावसाळ्यासाठी मोठ्या प्रमाणावर रोप निर्मिती करण्यात येत आहे. वन महोत्सव कालावधीत विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच विविध यंत्रणांना रोपे उपलब्ध करुन देण्यासाठी सुमारे 9.43 लाख रोपांची निर्मिती केली जात आहे. यात लहान आकाराच्या पिशवीतील 8.35 लाख आणि उंच आकाराच्या पिशवीतील 1.08 लाख रोपांचा समावेश आहे. रोपवाटिकांमध्ये आवश्यक पायाभूत सुविधा देऊन उत्कृष्ट दर्जाची रोपे तयार केली जात आहेत. केंद्र सरकारच्या पर्यावरण शिक्षण कार्यक्रमांतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील 100 हरितसेना शाळांमध्ये निसर्ग, शाश्वत विकास आणि पर्यावरणीय समस्यांबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. सामाजिक वनीकरण विभागाच्या विविध योजना नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रचार, प्रसिध्दी आणि जनजागृतीवर विशेष भर दिला जात आहे. वैश्विक तापमानवाढ, ऋतूचक्रातील बदल आणि नैसर्गिक आपत्तींच्या वाढत्या प्रमाणामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करणे आवश्यक आहे. यासाठी पाटबंधारे, सार्वजनिक बांधकाम, कृषी विभाग, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांसारख्या विविध विभागांच्या समन्वयातून वृक्ष लागवडीचे कार्यक्रम राबवण्यात येत आहेत. सामाजिक वनीकरण विभाग या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करीत आहे.

# डोक्यावरचा हंडा काढा; पाणीपुरवठ्याचे नियोजन करा

**स्वयंपाकापासून ते सांडपाण्यापर्यंत घरात पाणी आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी भारतातील पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये पिढ्यानपिढ्या महिलांनी सांभाळली आहे. आजही अनेकांना आपली आई, बहीण किंवा आजी डोक्यावर हंडा, कळशी किंवा घागर घेऊन लांबवरून पाणी आणतानाचे प्रसंग आठवतो. भारतात आता हे चित्र कालबाह्य झाले तरी जगभरात अधिकही अनेक देशात नागरिक शुद्ध व नियमित पाणीपुरवठ्यापासून वंचित आहेत. त्यामुळे यंदा 22 मार्चला जागतिक जल दिवस साजरा करताना संयुक्त राष्ट्राने पाणी व्यवस्थापनात महिला सक्षमीकरणाला प्राधान्य दिले आहे.**





भारताने पेयजलाच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे.घराघरांत नळाद्वारे पाणी पोहोचवण्यासाठी जलजीवन मिशन प्रभावीपणे राबविण्यात आले. तरीही काही भागांत पाणीटंचाई कायम आहे आणि त्याचा सर्वाधिक भार महिलांवरच पडतो. ही समस्या केवळ भारतापुरती मर्यादित नसून जागतिक पातळीवरही ती तितकीच गंभीर आहे. म्हणूनच यंदाचा जागतिक जल दिवस "पाणी आणि महिला सक्षमीकरण" या व्यापक संकल्पनेशी जोडून साजरा केला जात आहे. पृथ्वीवरील सुमारे ७१ टक्के भाग पाण्याने व्यापलेला असला, तरी त्यातील केवळ २.५ टक्के पाणी गोड आहे. त्यातीलही अत्यल्प भाग मानवाच्या वापरासाठी उपलब्ध आहे. त्यामुळे पाण्याची विपुलता ही केवळ भास आहे. हवामान बदल, लोकसंख्यावाढ,औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यामुळे पाण्याची मागणी वाढत असताना उपलब्धतेत आणि वितरणात मोठी असमानता निर्माण झाली आहे. या असमानतेचा सर्वाधिक फटका स्त्रिया आणि मुलींना बसतो. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालांनुसार, जगभरातील १ अब्जाहून अधिक स्त्रिया अजूनही सुरक्षित पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत. सुमारे १.८ अब्ज लोकांच्या घराजवळ पाणी उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत प्रत्येक तीन घरांपैकी दोन घरांमध्ये पाणी आणण्याची जबाबदारी महिलांवर असते. ५३ देशांतील आकडेवारीनुसार स्त्रिया आणि मुली दररोज एकत्रितपणे सुमारे २५० दशलक्ष तास पाणी आणण्यात खर्च करतात. ही वेळ शिक्षण, रोजगार किंवा वैयक्तिक विकासासाठी वापरता आली असती. अशुद्ध पाणी आणि स्वच्छतेच्या अभावामुळे दररोज सुमारे १,००० बालकांचा मृत्यू होतो. याशिवाय जगातील सुमारे १४ टक्के देशांमध्ये पाणी व्यवस्थापनाच्या निर्णयप्रक्रियेत महिलांचा समान सहभाग निश्चित करणारी ठोस यंत्रणा नाही.

हे आकडे स्पष्ट करतात की जलसंकट हा केवळ नैसर्गिक प्रश्न नसून तो सामाजिक, आर्थिक आणि लिंगभेद करणारा आहे. भारतीय संविधानामुळे स्त्री-पुरुष समानतेचा पाया मजबूत झाला आहे.आज महिला उद्योग, शिक्षण, आरोग्य अशा अनेक क्षेत्रांत नेतृत्व करत आहेत. पाणी व्यवस्थापनातही त्यांचा अनुभव अमूल्य आहे. मात्र ही स्त्री समानता आत्ता

■ प्रवीण टाके ■
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
कोल्हापूर 9702858777

जलव्यवस्थापनातही आणणे केवळ आपल्याच देशाची नाही तर जगभराची गरज बनली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मते, जलव्यवस्थापनात महिलांचा सहभाग वाढल्यास सेवा अधिक शाश्वत, समावेशक आणि प्रभावी ठरतात. त्यामुळे महिलांना 'पाणी आणणाऱ्या भूमिकेतून 'पाणी नियोजन करणाऱ्या भूमिकेत आणणे आवश्यक आहे.

पाणी हे जीवनाचेच नव्हे तर अर्थव्यवस्थेचेही मूलभूत साधन आहे. जगभरात उपलब्ध शुद्ध पाण्यापैकी सुमारे ७० टक्के पाणी शेतीसाठी वापरले जाते, तर उद्योग आणि ऊर्जा क्षेत्रालाही मोठ्या प्रमाणावर पाण्याची गरज असते.

ज्या देशांनी प्रभावी जलव्यवस्थापन केले, तेथे आर्थिक प्रगती वेगाने झाली. इस्रायलने ठिबक सिंचन, सिंगापूरने सांडपाण्याचा पुनर्वापर, नेदरलँडने पूर नियंत्रण आणि ऑस्ट्रेलियाने जलसंधारण धोरण यशस्वीपणे राबविले. ही उदाहरणे योग्य नियोजनाचे महत्त्व अधोरेखित करतात.

पाण्याच्या समस्येवर उपाय म्हणून विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. समुद्राच्या खाऱ्या पाण्याचे गोड्या पाण्यात रूपांतर (डिसॅलिनेशन), सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापर, तसेच नदी पुनरुज्जीवन प्रकल्प यांवर भर दिला जात आहे.

महाराष्ट्रातील नागपूर येथे सांडपाण्याचा औद्योगिक वापर केला जातो, तर नवी मुंबईचे सांडपाणी व्यवस्थापन आदर्श मानले जाते. याशिवाय वृक्षारोपण आणि जलसंधारण हे पर्यावरणीय संतुलनासाठी अत्यावश्यक उपाय आहेत. पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे ही जलसंधारणाची सर्वात प्रभावी पद्धत आहे. यामुळे भूजल पातळी वाढते, विहिरी जिवंत राहतात आणि शेतीसाठी पाणी उपलब्ध होते. शहरी भागातही रेनवॉटर हार्वेस्टिंग अनिवार्य करणे आवश्यक आहे. शासनाने नव्या बांधकामांसाठी ही अट बंधनकारक केली आहे, ही सकारात्मक बाब आहे. भारत सरकारने पाणी व्यवस्थापनासाठी विविध योजना राबवल्या आहेत—जल जीवन मिशन – प्रत्येक जल जीवन मिशन, अटल भूजल योजना,जलशक्ती अभियान,स्वच्छ भारत मिशन,महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना,मुख्यमंत्री जलसंधारण योजना,नमामि गंगे योजना अशा कितीतरी योजनांमधून केंद्र व राज्य शासन जनतेला शुद्ध पेयजल उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करत आहे.

शासन स्तरावर विविध योजना राबविण्यात येत असल्या तरी सामान्य नागरिकांनीही या मोहिमेत एक जबाबदार नागरिक म्हणून पुढे येणे गरजेचे आहे.पाणी वाचवण्याची सुरुवात शासनाकडून नव्हे, तर घरापासून होते. आपण काही सोपे उपाय अवलंबू शकतो.जसे की,नळ आणि पाईप गळती त्वरित दुरुस्त करणे,रेनवॉटर हार्वेस्टिंग करणे, सांडपाण्याचा पुनर्वापर,ठिबक सिंचनाचा वापर पाण्याचा अपव्यय टाळणे,वृक्षारोपण करणे,घरातील पाणी व्यवस्थापनात महिलांचा निर्णयाधिकार मान्य करणे,पाणी हा केवळ नैसर्गिक संसाधन नसून तो मानवी हक्क, सामाजिक न्याय आणि लिंगसमतेचा आधार आहे. जलसंकटाचा विचार करताना समतेचा दृष्टिकोन आवश्यक आहे. तसा विचार रुजवणे.यासोबतच घराघरात केवळ पाण्याच्या उपलब्धतेसाठी महिलांचे शोषण होणार नाही याची काळजी घेण्याचाही आजचा दिवस आहे. चला !तर महिलांच्या डोक्यावरचा हंडा काढूया आणि जल जीवन मिशन, अटल भूजल योजना,जलशक्ती अभियान,स्वच्छ भारत मिशन,महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना, विविध जलसंधारण योजनेच्या माध्यमातून पाणी टंचाई मुक्त समाज निर्मितीसाठी पुढे येऊया.. कारण पाणी वाचवणे म्हणजेच समाजाचे भविष्य सुरक्षित करणे होय.

## 'उमेद'च्या साथीने 'अन्नपूर्णा फूड अॅण्ड प्रॉडक्टस' ची लक्षवेधी घौडदौड

**व्यक्तीच्या क्षमतांना योग्य मार्गदर्शन, आर्थिक पाठबळ आणि संधींची साथ मिळाली तर तो स्वतःच्या यशस्वी वाटचालीतून, इतरांना प्रेरणा देणारा दिशादर्शक ठरणारा माईलस्टोन प्रवास करतो, याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे ग्रामविकास विभागातंर्गत ग्रामीन जीवनोन्नती अभियानातून यशस्वी वाटचाल करणाऱ्या अनेक सेल्फमेड उद्योजिका, ज्यांना उद्योग क्षेत्राची, व्यवसायाची कुठलीही पार्श्वभूमी नसताना आज घडीला त्यातील किती तरी जणीचे उद्योग व्यवसाय हे लाखांच्या वर आर्थिक उलाढाल करत आहेत.**

नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यातील रेणापूरच्या मीराबाई स्वय सहायता संघ, संविधान महिला ग्रामसमूह, सिद्धिविनायक प्रभागसंघ, पाळज येथील इयत्ता १० वी नापास असलेल्या विशेष म्हणजे उद्योगाची कुठलीही पार्श्वभूमी नसलेल्या अन्नपूर्णा फूड अँड प्रॉडक्ट्सच्या सर्वेसर्वा सुनीता अशोक कावळे यांचा उद्योजिका म्हणून सुरु असलेला यशस्वी प्रवास प्रेरणादायी आणि अभिनंदनीय आहे.

सुनीता कावळे त्यांच्या अन्नपूर्णा फूड अॅण्ड प्रॉडक्स अंतर्गत ११ प्रकारची आवळ्याची उत्पादने बनवतात. त्यांनी आपल्या व्यवसायाची सुरुवात केली ती फक्त ५०० रुपयाच्या भांडवलावर आणि आजघडीला अन्नपूर्णा फूड प्रॉडक्टस ९ लाखा रुपयांपर्यंतची उलाढाल करत आहे. विशेष उल्लेखनीय म्हणजे प्रतिकूल परिस्थितीत स्वावंलबनाचा मार्ग शोधण्याच्या धडपडीत आवळ्यासारख्या आरोग्यवर्धक फळातून खाद्य पदार्थ तयार करुन त्याच्या विक्रीतून काही करता येईल या विचाराने अवघ्या पाचशे रुपयात व्यवसाय करु पाहणाऱ्या सुनीता यांचा प्रवास सोपा नव्हता, कारण आर्थिक पाठबळ तर काही नव्हतेच मात्र त्यांच्या आत्मविश्वासाला पूरक पाठिंबा देणारे वातावरण ही घरात नव्हते उलट अवतीभवतीच्या महिलांकडूनही त्यांच्या या प्रयत्नांना टिकेच्या नजरेतून बघितल्या गेले, त्यांच्या धडपडीला गांभिर्याने घेतल्या गेले नाही, तर उलट त्यांना हे जमू शकणार नाही, असे म्हटले गेले, मात्र त्यांच्या मुलीने त्यांना प्रोत्साहन देत पाठिंबा दिल्याने त्या हिमतीने आपल्या व्यवसायात जम बसवण्यासाठी प्रयत्न करत राहिल्या.

आज अकरा प्रकारच्या पदार्थांची निर्मिती करणाऱ्या अन्नपूर्णा फूड प्रॉडक्टस्ची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या सुनीता यांनी २०१७ साली आवळ्यावर प्रक्रिया करून छोटेसे उत्पादन सुरू केले. गावात सहज मिळणाऱ्या कच्च्या मालावर आधारित आवळा कँडी, मुरंबा, चूर्ण, लोणचं इत्यादी पदार्थ बनवण्यास त्यांनी सुरवात केली. प्रत्येक गोष्ट त्यांनी स्वतःच्या हातांनी बनवली. या व्यवसायासाठी आवश्यक कच्चा माल असलेला आवळा आणण्यासाठी त्यांना बरीच मेहनत घ्यावी लागली, कधी कधी तर ५०, ६० कि.मी. लांबपर्यंत जाऊन आवळा आणण्यापासून ते तो वाळवणे, त्याच्यापासून उत्पादन तयार करण्यासाठीची सर्व मेहनत घेऊन तो तयार माल बाजारपेठेत विक्री करण्यापर्यंतची सर्व प्रक्रिया पार पाडत पुढे जात असताना सुनीता यांना अनेक अडथळे, अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र तरी त्या जिद्दीने पुढे जात राहिल्या, त्यांच्या या संघर्षात त्या २०१९ मध्ये उमेद (एमएसआरएलएम) अभियानाच्या माध्यमातून जोडल्या गेल्या. याठिकाणी त्यांच्या उद्योग उभारणीच्या प्रयत्नांना व्यावसायिक कौशल्य देणारे ब्रँडिंग, पॅकेजिंग, मार्केटिंग याची उपयुक्त माहिती देणारे प्रशिक्षण मिळाले.

ग्रामविकास विभागाच्या मार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सुनीता यांना विक्रमी विक्रीचा अविस्मरणीय अनुभव प्रत्यक्ष घेता आला, या प्रदर्शनात अन्नपूर्णा फूड प्रॉडक्टसच्या उत्पादनांना ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला त्यातून सुनीता यांनी आपल्या उत्पादनांची थोडी थोडकी नव्हे तर थेट १२ लाख रुपयांची विक्री केली, रेणापूर तालुक्यातील छोट्याशा गावातून सुरु केलेल्या व्यवसायाच्या उत्पादनांची इतकी मोठी विक्री होणे हे त्यांचे मोठे यश होते, कारण या विक्रीतून त्यांचा आत्मविश्वास वृद्धीगंत होऊन उद्योगाचे नवीन दालन त्यांच्यासमोर खुले झाले. व्यापक स्वरुपातील बाजारपेठेची ओळख आणि प्रत्यक्ष सहभागी होण्याचा अनुभव त्यांना पुढील वाटचालीसाठी निश्चितच प्रेरणा देणारा आहे.

आपल्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या सुनीता यांना व्यवसाय वाढवण्यासाठी शासन योजनांच्या माध्यमातून उत्तम सहकार्य मिळत असून (पीएमएफएमई) योजना, शासकीय अनुदान, मशिनरी, पॅकेजिंग यूनिट यासाठी अर्थसहाय्य मिळण्यासाठीची प्रक्रिया त्यांनी सुरु केली आहे. आवळ्याचे उत्पादन आरोग्यदायी आहे, त्याला मोठी मागणी आहे, आणि भविष्यात 'अन्नपूर्णा' हा ब्रँड संपूर्ण भारतात पोहोचेल या विश्वासातून कार्यरत सुनीता यांचा हा प्रेरणादायी प्रवास इतरांच्या उमेदीला निश्चितच बळ देणारा आहे.

आपल्याला स्वावलंबनाची मिळालेली संधी अन्य महिलांच्या ही वाट्याला यावी, ही प्रामाणिक इच्छा असेलल्या सुनीता यांना स्वतःच्या यशाप्रमाणे इतर महिलांनीही यशाची चव चाखावी, असे प्रकर्षाने वाटते. म्हणूनच त्यांनी महिलांना विशेषतः विधवा, परित्यक्ता, गरजू महिलांना स्वअनुभवातून व्यवसायाचे मार्गदर्शन केले, त्यांच्या हाताला काम दिले. "एक बाई सक्षम झाली, की ती इतरांना मदतीचा हात देऊ शकते." या व्यापक जाणीवेतून सुनीता यांचा 'अन्नपूर्णा' हे केवळ फूड ब्रँड नाही, तर महिलांना स्वाभिमानाने उभे करणारे एक व्यासपीठ आहे. आर्थिक, शैक्षणिक भांडवलाचा अभाव असताना अडचणींतून मार्ग काढत स्वकष्टाने आणि जिद्दीने सुनीता यांनी इथपर्यंतचा गाठलेला टप्पा हा निश्चितच यशाच्या प्रवासातील मैलाचा दगड आहे.

**शब्दांकन – वंदना थोरात,
वरिष्ठ सहायक संचालक,
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय**

# भोंदूगिरी, सत्तेची छाया आणि सत्य दडपण्याचा खेळ

## अशोक खरात प्रकरणातून उघड होणारे भयावह वास्तव




आजच्या लोकशाही व्यवस्थेत सर्वसामान्य नागरिकांचा शासनावर असलेला विश्वास हा सर्वात मोठा आधारस्तंभ मानला जातो. परंतु जेव्हा सत्ताधारीच त्या विश्वासाला तडा देणाऱ्या घटनांमध्ये गुंतलेले दिसतात, तेव्हा प्रश्न केवळ एका व्यक्तीचा राहत नाही, तर तो संपूर्ण व्यवस्थेच्या प्रामाणिकतेवर उभा ठाकतो. भोंदू अशोक खरात प्रकरणाने सध्या राज्याच्या राजकारणात अशीच खळबळ उडवली आहे. या प्रकरणात अर्धे मंत्रिमंडळ अडकण्याच्या भीतीने ते दडपण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा रंगू लागली आहे आणि हीच बाब अधिक गंभीर आहे. अशोक खरात नावाचा एक तथाकथित "गुरु" किंवा "बाबा" आपल्या चमत्कारांच्या, अंधश्रद्धेच्या आणि मानसिक प्रभावाच्या जाळ्यात अनेकांना अडकवत होता, हे आता उघड झाले आहे. मात्र, या भोंदूगिरीमागे केवळ एक व्यक्ती नसून, त्याला मिळालेली राजकीय पाठराखण ही अधिक धक्कादायक आहे. समाजातील काही प्रभावशाली व्यक्ती, अधिकारी आणि राजकीय नेते यांचे त्याच्याशी असलेले संबंध हळूहळू समोर येत आहेत आणि इथेच प्रश्न निर्माण होतो. जर सत्तेतील लोकच अशा भोंदूगिरीला खतपाणी घालत असतील, तर सामान्य माणसाने कोणावर विश्वास ठेवायचा?

या प्रकरणात सर्वात धोकादायक बाब म्हणजे, सत्य बाहेर येऊ नये म्हणून चाललेले प्रयत्न. तपास यंत्रणांवर दबाव, पुरावे दडपण्याचा प्रयत्न, साक्षीदारांना धमकावणे, हे सगळे चित्र लोकशाहीला कलंक लावणारे आहे. जेव्हा "अर्धे मंत्रिमंडळ अडकण्याची भीती" ही चर्चा पुढे येते, तेव्हा हे स्पष्ट होते की हा केवळ एक गुन्हा नसून, सत्तेच्या उच्च पातळीवर पोहोचलेला भ्रष्टाचाराचा जाळ आहे. वृत्तपत्रांनी नेहमीच जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे. त्याच परंपरेत या प्रकरणाकडे पाहिले, तर ही घटना केवळ गुन्हेगारी स्वरूपाची नाही, तर सामाजिक आणि राजकीय अधःपतनाचे प्रतीक आहे. अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीविरोधात कायदे असतानाही, अशा व्यक्तींना राजकीय आश्रय मिळतो, ही वस्तुस्थिती अत्यंत वेदनादायक आहे. महाराष्ट्र ही संतांची, विचारवंतांची भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांपर्यंत, या भूमीने नेहमीच विवेक, विज्ञाननिष्ठा आणि सामाजिक न्याय यांचा पुरस्कार केला आहे. मग आज त्याच महाराष्ट्रात भोंदूगिरीला इतकी मोकळीक कशी मिळते? याचे उत्तर शोधताना आपण सत्तेच्या राजकारणाकडे दुर्लक्ष करू शकत नाही. अशोक खरातसारख्या व्यक्तींना फोफावण्यासाठी केवळ लोकांची अंधश्रद्धा कारणीभूत नसते; त्यामागे सत्तेचा आशीर्वाद असतो. जेव्हा मंत्री, आमदार किंवा प्रभावशाली नेते अशा व्यक्तींच्या कार्यक्रमांना हजेरी लावतात, त्यांचे गौरव करतात, तेव्हा समाजात एक चुकीचा संदेश जातो की, ही व्यक्ती खरोखरच प्रभावशाली आहे आणि मग सामान्य माणूसही त्या प्रभावाला बळी पडतो. या प्रकरणात जर खरोखरच मंत्रिमंडळातील काही सदस्य अडकत असतील, तर तपास अधिक पारदर्शक आणि कठोर होणे आवश्यक आहे. पण दुर्दैवाने, सध्या दिसणारी परिस्थिती उलट आहे. प्रकरण दाबण्याचा प्रयत्न होत असल्याच्या चर्चा म्हणजे लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. कारण, जर सत्ताधारीच स्वतःला वाचवण्यासाठी तपासात हस्तक्षेप करत असतील, तर न्यायव्यवस्थेवरचा विश्वास कोसळतो. यापूर्वीही देशात अनेक घोटाळे, प्रकरणे समोर आली आहेत, जिथे सुरुवातीला सत्य दडपण्याचा प्रयत्न झाला पण शेवटी सत्य बाहेर आलेच. कारण सत्याला कितीही दाबण्याचा प्रयत्न केला, तरी ते कधी ना कधी उघड होतेच. अशोक खरात प्रकरणातही हेच होईल, अशी जनतेची अपेक्षा आहे. मात्र, त्यासाठी समाजाची जागरूकता आणि माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

आजच्या डिजिटल युगात माहिती लपवणे इतके सोपे राहिलेले नाही. सोशल मीडिया, स्वतंत्र पत्रकारिता आणि जनतेची सतर्कता यामुळे अनेक गोष्टी उघडकीस येतात पण याचबरोबर खोटी माहिती पसरवण्याचाही धोका असतो. त्यामुळे या प्रकरणात सत्य आणि अफवा यामधील फरक ओळखणे आवश्यक आहे. तरीही, जे प्रश्न उभे राहिले आहेत, त्यांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे. या प्रकरणातून आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो, तो म्हणजे अंधश्रद्धेविरोधातील लढा. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनासाठी अनेक वर्षे कार्य झाले आहे पण तरीही अशा भोंदूंचा प्रभाव टिकून आहे, याचा अर्थ अजूनही समाजात जागृतीची गरज आहे. शिक्षण, विज्ञाननिष्ठ विचार आणि सामाजिक जबाबदारी यांचा प्रसार केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. राजकीय दृष्टिकोनातून पाहिले, तर हे प्रकरण सत्ताधाऱ्यांसाठी एक मोठी कसोटी आहे. जर त्यांनी पारदर्शक आणि निष्पक्ष तपासाला सहकार्य केले, तर त्यांचा विश्वास टिकू शकतो. पण जर प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला, तर जनतेचा रोष अधिक वाढेल. कारण आजचा मतदार जागरूक आहे, प्रश्न विचारतो आणि चुकीच्या गोष्टींना माफ करत नाही. विरोधकांची भूमिकाही येथे महत्त्वाची ठरते. त्यांनी या प्रकरणाचा केवळ राजकीय फायदा घेण्याऐवजी, सत्य बाहेर येण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण हा प्रश्न केवळ सत्तेचा नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या प्रामाणिकतेचा आहे. शेवटी, या प्रकरणाकडे केवळ एक घोटाळा म्हणून न पाहता, एक मोठा सामाजिक संदेश म्हणून पाहणे गरजेचे आहे. भोंदूगिरी, अंधश्रद्धा आणि सत्तेचा गैरवापर याविरोधात समाजाने एकत्र येणे आवश्यक आहे. कारण जर आपण आज आवाज उठवला नाही, तर उद्या अशा घटना आणखी वाढतील. अशोक खरात प्रकरण हे एक आरसा आहे, जो आपल्याला आपल्या समाजाचे आणि व्यवस्थेचे खरे स्वरूप दाखवत आहे. आता प्रश्न हा आहे की आपण त्या आरशात दिसणाऱ्या वास्तवाला स्वीकारून बदल घडवणार आहोत का, की पुन्हा एकदा डोळेझाक करून पुढे जाणार आहोत? लोकशाहीची खरी ताकद ही जनतेच्या सजगतेत असते आणि आज ती सजगता दाखवण्याची वेळ आली आहे. सत्य दडपण्याचा प्रत्येक प्रयत्न हा लोकशाहीवर आघात असतो. त्यामुळे या प्रकरणात निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भीड तपास होणे हीच काळाची गरज आहे.

# मन जिंकलं तर जग जिंकता येतं – कस्तुरबा मातृ मंडळाचा प्रेरणादायी उपक्रम

**उरुळी कांचन (दै. संध्या)**

हवेली तालुक्यातील उरुळी कांचन येथे जागतिक महिला दिनानिमित्त कस्तुरबा मातृ मंडळातर्फे "मन जिंकलं तर जग जिंकता येतं" या विषयावर प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्या अंतर्गत शक्तीला जागृत करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. प्रमुख वक्त्या ॲड. अश्विनी सचिन जगताप यांनी आपल्या प्रभावी शैलीत प्रेरणादायी व प्रभावी भाषण केले. त्यांच्या मार्गदर्शनातून महिलांना सकारात्मक विचारसरणी व आत्मविश्वासाची प्रेरणा मिळाली.





या कार्यक्रमाला आहारतज्ञ शोभा इंदानी, कार्यक्रमाच्या अध्यक्षा अलका साळुंखे, शुभताई मोघे, कस्तुरबा मातृ मंडळाच्या अध्यक्षा सुरेखा देविदास भन्साळी, सुशीला मेटे, जयश्री बेदरे, मीनल फुलपगार, संगिता भालके, रश्मी कुलकर्णी, आशा कांचन, अनिता चौधरी, प्रिया बलदोटा, छाया नहार, राजश्री शितोळे, स्वाती चौधरी, उज्वला लोखंडे तसेच जेष्ठ नेते प्रा. के. डी. कांचन, उरुळी कांचन पतसंस्थेचे चेअरमन देविदास भन्साळी, सरपंच मिलिंद जगताप, राजाराम कांचन, महादेव कांचन, एकनाथ चौधरी, जयप्रकाश बेदरे, अशोक सावंत, शिवाजी कांचन, आबासाहेब टिळेकर, हरिदास भन्साळी आदी मान्यवर उपस्थित होते.

कस्तुरबा मातृ मंडळाच्या अध्यक्षा सुरेखा देविदास भन्साळी यांच्या नेतृत्वाखाली मंडळाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवले असून, या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन हे मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या व सदस्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित आहे.

याच कार्यक्रमांतर्गत कस्तुरबा मातृ मंडळातर्फे महिलांसाठी निबंध स्पर्धा, विविध गुणदर्शन स्पर्धा आणि पाककृती स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धांमध्ये महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून आपले कौशल्य सादर केले. प्राचार्य राजकुमारी लक्ष्मी यांना आदर्श नारी पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

या उपक्रमामुळे महिलांना स्वतःकडे नव्या दृष्टीने पाहण्याची प्रेरणा मिळाली असून, आत्मविकासाच्या दिशेने सकारात्मक वाटचाल करण्याची उर्मी निर्माण झाली आहे. कस्तुरबा मातृ मंडळाचा हा उपक्रम महिलांसाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### शिरूरमध्ये जागतिक वन दिन उत्साहात साजरा वन व वणवा मुक्त जंगलासाठी सामूहिक शपथ

कवठे येमाई (दैनिक संध्या) : जागतिक वन दिनानिमित्त शिरूर रामलिंग येथे वन विभागाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी "वन व वणवा मुक्त जंगल" या संकल्पनेला बळ देण्यासाठी उपस्थितांनी सामूहिक शपथ घेतली.कार्यक्रमाचे अध्यक्ष गणेगावचे सरपंच तुकाराम निंबाळकर होते. प्रमुख पाहुणे व प्रमुख वक्ते म्हणून वरिष्ठ पत्रकार तथा युवा क्रांती फाउंडेशनचे राष्ट्रीय किसान विकास मंचचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुभाष शेटे यांनी या विषयावर उपस्थितांनी उत्कृष्ट मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी वनसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत नागरिकांनी पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. या प्रसंगी शिरूर वन विभागाचे शिंदे मेजर(वनपाल, शिरूर), झिरपे (वनरक्षक, शिरूर), डोईफोडे (वनरक्षक, बाभूळसर,बुद्रुक), सौ. सविता चव्हाण (वनरक्षक, मलठण), जे. व्ही. सानप (वनरक्षक, आलेगाव पागा) यांच्यासह न्हावरे येथील कॅम्प सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गणेगाव दुमाला चे सरपंच,जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते हभप तुकाराम दगडू निंबाळकरहे होते तर अंकुश मुगुटराव जगताप (मांडवगण फराटा) आणि सौ. तृप्ती अजय सरोदे (प्रदेश सचिव, राष्ट्रवादी महिला काँग्रेस) यांनीही कार्यक्रमास उपस्थिती लावली. कार्यक्रमात वनसंवर्धना बाबत जनजागृती करण्यात आली असून, जंगलांचे संरक्षण आणि वणव्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचा निर्धार सामूहिक वन संरक्षणाची शपथ घेऊन व्यक्त करण्यात आला.

### शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानात स्व. आ. सुरेशभाऊ गोरे विद्यालयाचा दुसरा क्रमांक



चाकण (दैनिक संध्या) : पुणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग आणि पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानात चाकण येथील स्व.आ. सुरेशभाऊ गोरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने द्वितीय क्रमांक मिळविला. या अभियानांतर्गत तालुक्यातील शाळांची अत्यंत काटेकोरपणे तपासणी करण्यात आली होती. यामध्ये शिक्षकांचे मूल्यमापन, प्रत्यक्ष अध्यापन प्रक्रिया, बोर्ड परीक्षेचे निकाल, शिष्यवृत्ती, परीक्षां मधील कामगिरी आणि बाह्य स्पर्धा परीक्षां मधील सहभाग अशा विविध शैक्षणिक निकषांचा समावेश होता. शालांतर्गत उपक्रम यांना गुणांकन देण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, उपाध्यक्ष राजेंद्र गोरे, ओंकार गोरे, प्रमिला गोरे, माधुरी गोरे यांनी या यशाचे श्रेय प्राचार्य, शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थ्यांना दिले आहे. भविष्यातही ही गुणवत्तेची परंपरा अशीच कायम राखली जाईल, असा विश्वास विकास गोरे व प्रमिला गोरे यांनी व्यक्त केला आहे. प्राचार्य सचिन आभाळे यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख दत्तात्रय लिंभोरे, शिक्षक सुवर्णा चौधरी, हर्षदा पवार, परमेश्वर कांबळे, मळेवाडी सिद्धराम, वैशाली दांगट, स्वाती काळे, रूपाली भालेराव, सुवर्णा कणसे तसेच सर्व शिक्षक यांनी या अभियानासाठी विशेष परिश्रम घेतले.

# पायाभूत विकास, बांधकाम क्षेत्रामध्ये आर्किटेक्टचे मोलाचे योगदान : आर्कि. विलास अवचट

**पुणे (दै. संध्या)**

■ आर्किटेक्ट, इंजिनिअर्स अँड सर्व्हेयर्स असोसिएशनतर्फे 'एईएसए वार्षिक पुरस्कार' वितरण




"पायाभूत सुविधा, बांधकाम क्षेत्राचा विकास झपाट्याने होत असून, त्यामध्ये आर्क्टिकेट बहुमूल्य योगदान देत आहेत. इंजिनिअर आणि आर्क्टिकेट यांची देशाला नवीन आकार देण्यात महत्वपूर्ण भूमिका आहे. बदलत्या काळात तंत्रज्ञानाच्या साहाय्याने स्पर्धात्मक व आव्हानात्मक प्रकल्प उभारणे सोपे होत आहे," असे प्रतिपादन इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्सचे अध्यक्ष आर्कि. विलास अवचट यांनी केले. कृत्रिम बुद्धिमतेसारखे तंत्रज्ञान अवगत करून आर्किटेक्ट्सनी स्वतःला समृद्ध करावे, असे आवाहनही त्यांनी केले. आर्किटेक्ट, इंजिनिअर्स अँड सर्व्हेयर्स असोसिएशनतर्फे (एईएसए-एसा) आयोजित 'एईएसए वार्षिक पुरस्कार' वितरण सोहळ्यात अवचट बोलत होते. पुरस्काराचे हे ३१ वे वर्ष होते. पुणे स्टेशनजवळील हॉटेल शेरेटोन ग्रँड येथे झालेल्या सोहळ्यावेळी 'एईएसए'चे अध्यक्ष आर्कि. राजीव राजे, चेअरमन आर्कि. महेश बांगड, संयोजक इंजि. पराग लकडे, बी. जी. शिर्के उद्योग समूहाचे व्हाईस चेअरमन आर. बी. सूर्यवंशी, संचालक वाय. पी. काजळे, वरिष्ठ उपाध्यक्ष बी. पी. कुलकर्णी, आर्कि. विश्वास कुलकर्णी आदी उपस्थित होते. यावेळी बीएनसीए व एईएसए यांच्यात पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन बिल्ट एन्व्हायर्नमेंटसाठी सामंजस्य करार झाला. आर्कि. राजीव राजे आणि डॉ. अनुराग कश्यप यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. आर्कि. विलास अवचट म्हणाले, "आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स व संबंधित क्षेत्रात कार्यरत असलेल्या घटकांसाठी काम करणारी ही संस्था आहे. वार्षिक पुरस्कार सोहळा चांगल्या कामाचे कौतुक करणारा उपक्रम आहे. गेल्या ५५ वर्षांत 'एईएसए' संस्थेने वेगवेगळे इंजिनिअर्स, आर्किटेक्ट, सर्व्हेयर्स जोडले आहेत. व्यावसायिकांनी एकत्रितपणे चांगले काम केल्यास कोणतेही काम मोठे किंवा छोटे असा भेदभाव राहत नाही. पुढील चार दशकात देश मोठ्या प्रमाणात विकास साधणार आहे. त्याचे साक्षीदार व साथीदार होण्याची संधी आपल्याला आहे." आर्कि. पंकज भागवतकर यांना 'रोहन यंग अचिवर्स अवॉर्ड', आर्कि. तुषार कोठावदे यांच्या ग्रंथालयला पुणे शहराबाहेरील, तर आर्कि. हेमंत शांताराम महाजन यांच्या पुण्यातील पीवायसी हिंदू जिमखाना विंचूरकर पॅव्हेलियनला 'नॉन रेसिडेन्शियल पब्लिक अँड कल्चरल बिल्डिंग' पुरस्कार, आर्कि. सौरभ मालपाणी यांच्या 'अ व्हिला इन पुणे' प्रकल्पाला, तर आर्कि. पूजा चाफळकर यांच्या जोशेट फार्म्सस्टे प्रकल्पाला, तर आर्कि. अभिषेक आहेर यांच्या ऐक्यम प्रकल्पाला 'सिंगल रेसिडेन्शियल फॅमिली होम' पुरस्कार, आर्कि. हेमंत शांताराम महाजन, आर्कि. धैर्यशील पोवार आणि माहेश्वरी डेव्हलपर्स यांना 'रेसिडेन्शियल स्टँड अलोन मल्टीटेनिमेंट बिल्डिंग पुरस्कार', आर्कि. विकास अचलकर यांच्या मॉंट क्लेअर प्रकल्पाला 'नॉन रेसिडेन्शियल कमर्शियल' पुरस्कार, तर आर्कि. शिरीष केंभावी यांच्या नॅशनल फिल्म अर्काइव्ह्ज प्रकल्पाला 'नॉन रेसिडेन्शियल इन्स्टिट्यूशनल' पुरस्कार, तर आर्किटेक्ट युनायटेडच्या केएसबी लिमिटेडचे प्रशासकीय कार्यालय प्रकल्पाला 'इंडस्ट्रियल बिल्डिंग अँड कॅम्पसेस' पुरस्कार करण्यात आला. बी. पी. कुलकर्णी, आर्कि. राजीव राजे यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. आर्कि. महेश बांगड यांनी स्वागत प्रास्ताविक केले. आर्कि. आलोका काळे यांनी सूत्रसंचालन केले. इंजि. पराग लकडे यांनी आभार मानले.

# सुर-संगीताने रंगले पं. जितेंद्र अभिषेकी महोत्सवाचे चौथे सत्र

**पुणे (दै. संध्या)**

अवीट गोडीच्या चालींनी सजलेल्या बंदिशी, गायकांचे अप्रतिम सादरीकरण, सरोदच्या तारांवर उमटणारे मधुर सूर आणि रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद अशा सुरेल संगमाने पंडित जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सव रंगून गेला. तरंगिनी सांस्कृतिक प्रतिष्ठान आणि 'आपला परिसर' संस्थेतर्फे कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित विसाव्या पंडित जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात निषाद व्यास (गायन), अनुपम जोशी (सरोद) आणि जयंत केजकर (गायन) यांनी आपल्या कलेचा अप्रतिम आविष्कार सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. सकाळच्या सत्राची सुरुवात निषाद व्यास यांच्या गायनाने झाली. त्यांनी राग गुजरी तोडीमध्ये सादर केलेल्या 'सरस्वती चे मागत हो' या बंदिशीने रसिकांना सुरेल आनंदाची अनुभूती दिली. त्यानंतर 'साधू रचना राम बनाई रे' या सादरीकरणातून त्यांनी बनारस घराण्याच्या गायकीचा ठसा उमटवला. त्यांच्या सादरीकरणाला कौशिक केळकर (तबला) आणि माधव लिमये (संवादिनी) यांची समर्थ साथ लाभली. यावेळी बोलताना निषाद व्यास यांनी, "जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवात सादरीकरणाची संधी मिळणे ही माझ्यासाठी मोठी गौरवाची बाब आहे. येथे गायन करणे म्हणजे पंडित अभिषेकी यांच्या चरणी संगीत सेवा अर्पण करण्यासारखे आहे," असे सांगितले.

# परभणीतून वर्षभरापूर्वी बेपत्ता झालेली मुलगी पुण्यात सापडली

## पोलिस आणि मिसिंग ग्रुपच्या प्रयत्नांमुळे मुलगी सुखरूप ताब्यात

**पुणे (दै. संध्या)**

परभणी जिल्ह्यातून वर्षभरापूर्वी बेपत्ता झालेली १५ वर्षीय मुलगी अखेर पुण्यातून सुखरूप ताब्यात घेण्यात आली असून, पोलिस आणि सामाजिक संघटनांच्या समन्वयातून ही मोठी यशस्वी कारवाई पार पडली आहे.

वंदना देविदास साळवे (वय १५) ही मुलगी १० एप्रिल २०२५ रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास परभणी जिल्ह्यातील काष्टागाव येथून कोणालाही न सांगता घरातून निघून गेली होती. याप्रकरणी परभणी ग्रामीण पोलीस ठाण्यात हरवल्याची नोंद करण्यात आली होती.



दरम्यान, २१ मार्च २०२६ रोजी पुणे परिसरात संबंधित मुलगी असल्याची माहिती परभणी पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली. तपासादरम्यान स्थानिकांकडून महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपचे अध्यक्ष शिवाभाऊ पासलकर यांच्या संपर्कात जाण्याचा सल्ला देण्यात आला.

यानंतर परभणी पोलिसांनी पासलकर यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांच्या मदतीने शोधकार्याला गती मिळाली. पासलकर यांनी भारती विद्यापीठ परिसरात स्थानिक पोलिसांच्या मदतीने तपास सुरू केला. अखेर दुसऱ्याच दिवशी कात्रज चौक परिसरातून मुलगी ताब्यात घेण्यात आली.

ही कारवाई भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन आणि महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुप यांच्या संयुक्त प्रयत्नातून पार पडली. त्यानंतर मुलीला सुरक्षितपणे परभणी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या शोधमोहीमेत परभणी पोलीस ठाण्याचे अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक राजगुरू, पोलीस हवालदार सुधीर डोंबे, शंकर जाधव तसेच भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल खिलारे आणि अधिकारी किरण देशमुख यांनी विशेष सहकार्य केले.

परभणी पोलिसांनी या कारवाईसाठी भारती विद्यापीठ पोलिस आणि महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपचे अध्यक्ष शिवाभाऊ पासलकर यांचे आभार मानले आहेत.

# पुणे कॉमिक कॉनमध्ये चाहत्यांच्या उत्साहाला उधाण, पॉप संस्कृतीच्या प्रेमींसाठी अनोखी पर्वणी

**पुणे (दै. संध्या)**

मारुती सुझुकी ॲरेना प्रस्तुत आणि क्रंचीरोलचे पाठबळ असलेल्या बहुप्रतिक्षित पुणे कॉमिक कॉन २०२६ चा पहिला दिवस शनिवारी मेफिल्ड यश गार्डन येथे मोठ्या उत्साहात सुरू झाला. वीकेंडच्या निमित्ताने २१ आणि २२ मार्च रोजी रोजी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या उद्घाटन दिवशी प्रचंड गर्दी झाली. कॉमिक्स, ॲनिमे, गेमिंग आणि पॉप कल्चरशी संबंधित सर्व गोष्टींचा आनंद साजरा करण्यासाठी चाहत्यांनी कार्यक्रमस्थळी गर्दी केली. त्यातून एका अविस्मरणीय वीकेंडची सुरुवात झाली.




कार्यक्रमाच्या उद्घाटनाच्या दिवशी चाहत्यांनी विशेष अशा "क्रिएटर्स अक्रॉस बॉर्डर्स" या सेगमेंटमध्ये जागतिक कॉमिक क्रिएटर जोश ब्लेलॉक यांच्याशी उत्साहाने संवाद साधला. भारतीय क्रिएटर्सच्या सत्रांमध्ये, तसेच पुणे ॲनिमे कम्युनिटीने आयोजित केलेल्या संवादात्मक सत्रांमध्येही चाहत्यांचा मोठा सहभाग दिसून आला.

कॉमिक कॉनमध्ये पहिल्या दिवशी मनोरंजन आणि प्रतिभेने संपन्न असे दमदार कार्यक्रम सादर झाले. यात स्टँड-अप कॉमेडियन सिद्धार्थ शेट्टीने आपल्या मार्मिक निरीक्षणात्मक विनोदाने आणि मंचावरील सहज वावराने प्रेक्षकांना खळखळून हसवले. कुमार वरुण याने 'क्विझिंग विथ केव्ही' या कार्यक्रमात आपल्या खास विनोदबुद्धीने सामान्य ज्ञान, विनोद आणि प्रेक्षकांशी उत्साही संवाद यांचा एक ऊर्जापूर्ण मिलाफ सादर केला.

गेमिंगचे शौकिनसुद्धा चाहत्यांसाठीच्या एका खास क्षणाचा अनुभव घेता येईल, कारण रॉयल चॅलेंज पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरच्या वतीने भारतातील आघाडीचे गेमिंग यूट्यूबर स्कॉट (तन्मय सिंग) यांना एका विशेष 'मीट-अँड-ग्रीट' कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. या बूथवर ब्रँडचा 'चॅलेंजर गेमिंग झोन' देखील असून त्यामध्ये इमर्सिव्ह व्हीआर क्रिकेटचा अनुभव मिळेल. आपल्या तल्लख विनोदबुद्धी आणि आत्मविश्वासपूर्ण मंचीय उपस्थितीसाठी ओळखल्या जाणाऱ्या स्टँड-अप कॉमेडियन फातिमा आयेशाच्या सादरीकरणाने हास्यकल्लोळ सुरूच राहील. तसेच, संगीतप्रेमी मुंबईतील उदयोन्मुख हिप-हॉप सेन्सेशन ९९साइडच्या दमदार परफॉर्मन्ससाठी सज्ज होऊ शकतात. त्याने एमटीव्ही हसल ४.० मध्ये फायनलिस्ट म्हणून राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवली आहे.

मारुती सुझुकी एरिना प्रस्तुत आणि क्रंचीरोलचे समर्थन असलेल्या बहुप्रतिक्षित पुणे कॉमिक कॉन २०२६ च्या पहिल्या दिवसाची सुरुवात शनिवारी मेफिल्ड यश गार्डन येथे मोठ्या उत्साहात झाली. २१ आणि २२ मार्च रोजी वीकेंडला आयोजित या कार्यक्रमाच्या उद्घाटन दिवशी प्रचंड गर्दी झाली. कॉमिक्स, ॲनिमे, गेमिंग आणि पॉप कल्चरशी संबंधित सर्व गोष्टींचा आनंद साजरा करण्यासाठी चाहत्यांनी कार्यक्रमस्थळी गर्दी केली, ज्यामुळे एका अविस्मरणीय वीकेंडची सुरुवात झाली. उद्घाटन दिवशी, चाहत्यांनी विशेष "क्रिएटर्स अक्रॉस बॉर्डर्स" या सेगमेंटमध्ये जागतिक कॉमिक क्रिएटर जोश ब्लेलॉक यांच्याशी उत्साहाने संवाद साधला. भारतीय क्रिएटर्सच्या सत्रांमध्ये, तसेच पुणे ॲनिमे कम्युनिटीने आयोजित केलेल्या संवादात्मक सत्रांमध्येही चाहत्यांचा मोठा सहभाग होता.

पहिल्या दिवशी मनोरंजन आणि प्रतिभेचा एक दमदार कार्यक्रम सादर झाला. स्टँड-अप कॉमेडियन सिद्धार्थ शेट्टीने आपल्या मार्मिक निरीक्षणात्मक विनोदाने आणि सहज मंचीय उपस्थितीने प्रेक्षकांना खळखळून हसवले, तर कुमार वरुणने 'क्विझिंग विथ केव्ही'मध्ये आपल्या खास विनोदबुद्धीने सामान्य ज्ञान, विनोद आणि प्रेक्षकांशी उत्साही संवाद यांचा एक ऊर्जापूर्ण मिलाफ सादर केला. पुणे आवृत्तीमध्ये विविध प्रकारच्या आंतरसंवादात्मक अनुभव (इमर्सिव्ह एक्स्पीरियन्स) झोन्सचाही समावेश होता. आलेले लोक खेळांमध्ये तल्लीन झाल्यामुळे मारुती सुझुकी ॲरेनामध्ये प्रचंड लगबग होती. क्रंचीरोल बूथने खास तयार केलेल्या सेटअप्समुळे ॲनिमे चाहते आकर्षित होत होते. उपस्थितांनी एका अनोख्या व्हर्च्युअल स्पेस मिशनची वातावरण निर्मिती करणाऱ्या व्हीआर डोमच्या माध्यमातून साय-फाय मल्टीमीडिया अनुभवाचा मागोवा घेतला. तसेच, त्यांनी वॉर्नर ब्रदर्सने डिझाईन केलेल्या एस्केप रूमचा सामना केला आणि 'द सुपर मारिओ गॅलेक्सी' व 'नायका'च्या इंटरॲक्टिव्ह इन्स्टॉलेशन्सचा आनंद घेतला. गेमिंग ॲरेनामध्येसुद्धा दिवसभर खचाखच गर्दी दिसून आली. यामधील उत्साही आणि ऊर्जापूर्ण वातावरणाचा चाहत्यांनी पुरेपूर आनंद लुटला.

चाहत्यांनी 'चेनसॉ मॅन'मधील डेन्जी, 'सोलो लेव्हलिंग'मधील शॅडो इग्रिस, 'वन पीस'मधील झोरो, 'मार्व्हल'मधील लोकी आणि अशा अनेक आवडत्या पात्रांची वेशभूषा करून रूपांतर केले. त्यामुळे कॉस्प्ले हे एक प्रमुख आकर्षण ठरले. दररोज ३०,००० रुपयांच्या रोख बक्षिस देणाऱ्या पुण्यातील सर्वात मोठ्या कॉस्प्ले स्पर्धेत ते उतरले आणि खऱ्या अर्थाने लक्षवेधक पद्धतीने चाहत्यांच्या प्रेमाला (फॅनडम्सला) जिवंत केले.

कॉमिक कॉन इंडियाच्या सीईओ शेफाली जॉन्सन म्हणाल्या, "पुण्यात एक विशेष ऊर्जा आहे आणि ती तुम्हाला सर्वत्र दिसून येते; कोरेगाव पार्कमध्ये कॉफी पीत गप्पा मारणाऱ्या लोकांपासून ते एफसी रोडजवळील विद्यार्थी आणि जुन्या शहरातील कला व नाट्य समुदायापर्यंत. चाहत्यांनी जेव्हा उत्तम प्रश्न विचारले, खूप विचार करून कॉस्प्ले केला आणि मनसोक्त आनंद लुटला तेव्हा त्यामधून ही ऊर्जा पहिल्याच दिवशी दिसून आली. आपल्याला आवडणाऱ्या गोष्टींचा आनंद साजरा करण्यासाठी शहरवासी कसे एकत्र येत आहे, हे आम्हाला आताच जाणवू लागले आहे आणि दुसऱ्या दिवशीही हेच अधिक पाहण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत." पहिल्याच दिवशी एक उच्च मापदंड स्थापित झाला असल्यामुळे, दुसऱ्या दिवशी आणखी उत्साह असण्याची अपेक्षा आहे. यामध्ये उपस्थितांना एका विशेष 'क्रिएटर्स जॅम'ची अपेक्षा करता येईल, त्यामध्ये जोश ब्लेलॉक, सॅविओ मस्करेन्हास, अभिजीत किनी, सौमिन पटेल, विभा राव आणि अलाना विनायक हे कॉमिक निर्मितीच्या कला आणि कौशल्याबद्दल माहिती देतील.